भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने



WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२२३ ■ रविवार १७ मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.No./DHL/53/24-26

॥ श्री गणेशाय नमः ॥
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

# नीट पेपर फुटीचा मास्टर माईंड प्राध्यापक पी.व्ही कुलकर्णी निघाला प्राध्यापिका मनीषा मांढरे व ब्यूटी पार्लर चालक वाघमारेला अटक

**पुणे, दि.१६- शिक्षणाची पंढरी असलेल्या पुण्यातून नीट घोटाळ्याचा मास्टर माइंड सीबीआयने ताब्यात घेतले असल्याने सर्वत्र एकच खेळ उडाली आहे. लातूर येथील नामांकित दयानंद महाविद्यालयात रसायनशास्त्राचे शिक्षण देणारे व निवृत्तीनंतर पुणे येथे क्लासेस घेणारे पी व्ही कुलकर्णी यांना शुक्रवारी सीबीआय ने ताब्यात घेतले. त्याच प्रमाणे जीवशास्त्राच्या प्राध्यापिका मनीषा गुरुनाथ मांढरे व ब्युटी पार्लर ब्युटी पार्लर चालवणाऱ्या मनीषा वाघमारे यांच्यासह नऊ जणांना सीबीआयने आतापर्यंत अटक केली आहे. राज्यातील खाजगी नीट क्लास चालकांमध्ये यामुळे एकच खळबळ उडाली आहे.**

मेडिकलच्या प्रवेशासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या २०२६ चा पेपर फुटल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली होती. ३ मे रोजी परीक्षा झाली होती. मात्र पेपर फुटी ची माहिती समोर आली आणि त्यानंतर १२ मे रोजी नॅशनल टेस्टिंग एजन्सी ने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घोषित केला. २२ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली असल्याने सर्वांमध्ये संतापची लाट उसळली होती. परीक्षा रद्द झाल्यामुळे तीन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे. यामुळे सरकारवर टीका करत विरोधकांनी जोरदार हल्लाबोल केला होता प्रकरणाची गांभीर्य बघत सरकारने देखील तातडीने हे प्रकरण सीबीआयकडे सोपवले.

शुक्रवारी या प्रकरणातील मास्टर माईंड म्हणून पी व्ही कुलकर्णी यांना सीबीआयने अटक केली. पुण्यातून (पान ८ वर)

## इबोला व्हायरसमुळे पासष्ट जणांचा मृत्यू

नवी दिल्ली, दि. १६ : काही वर्षांपूर्वी जगावर कोरोनाचे मोठे संकट आले होते. कोरोनामुळे अनेकांनी आपला जीव गमावला, जगभरात लाखो लोकांचा कोरोनामुळे मृत्यू झाला. त्यानंतर आता आता जगात आणखी एका व्हायरसमुळे हाहाकार उडाला आहे. आफ्रिका खंडातील कांगोमध्ये इबोला व्हायरसने धुमाकूळ घातला आहे. आतापर्यंत २४६ जणांना या आजाराची लागण झाली असून, या आजारामुळे ६५ जणांचा मृत्यू झाला आहे.

इबोला हा आजार खूप दुर्मिळ आहे. मात्र तेवढाच तो खतरनाक देखील आहे, कारण तो खूप प्रचंड वेगाने पसरतो. इबोला आजारामध्ये मृत्यूचे प्रमाण हे अधिक आहे. हा आजार तरल (पान ८ वर)

# साक्री तालुक्यात तरुण व विवाहीतेची निघृण हत्या भोंदुगिरीने घेतला दोघांचा बळी, संशयीत ताब्यात

**अंबादास बेनुस्कर**
**पिंपळनेर, दि.१६ (प्रतिनिधी)- साक्री तालुक्यातून एक दुहेरी हत्याकांडाची घटना समोर आली आहे. साक्री तालुक्यातील वर्धाने आणि उभरांडी शिवारात दोघांचे मृतदेह आढळून आल्याने खळबळ माजली असून हे दुहेरी हत्याकांड भोंदुगिरीच्या नादी लागल्याने झाल्याचे बोलले जात आहे.या प्रकरणी पोलिसांनी एका संशयित भोंदुला ताब्यातही घेतले आहे.**




संशयित भोंदु

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी भडगांव (वर्धाने) टेंभे फाट्याजवळ विवाहितेचा मृतदेह आढळून आला. मृतदेहाच्या अंगावर ॲक्सेस (एमएच सी, एफ) ही दुचाकी टाकण्यात आलेली होती. तसेच महिलेचे तोंड हे रुमालाने बांधलेले असल्याने हा घातपाताचा प्रकार असल्याचे पोलिसांच्या लागलीच लक्षात आले. घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ विवाहितेची ओळख पटवली. सदर मृत महिलेचे नाव जयश्री रजनीकांत काकुस्तेअसून ती कासारेची रहिवासी आहे.बचत गटांसाठी ती बजाज फायनान्समार्फत कलेक्शनचे काम करायची.काल रात्री शेवटच्या वेळेला तिचे पतीशी कॉलद्वारे संभाषण झाले. त्यानंतर तिचा फोन बंद येत होता. आज सकाळी तिच्या खुनाची बातमी समजताच काकुस्ते परिवार हादरला. जयश्रीच्या मृतदेहाजवळ तिची पर्स व मोबाईलही होता. त्यामुळे ही हत्या लुटीतून झालेली नसल्याचे उघड झाले आहे.परिणामी, जयश्रीचा खून कोणी केला? हा प्रश्न सर्वांना सतावू लागला.

**संशयित ताब्यात**

पोलिसांनी अवघ्या काही मिनीटांतच संशयित(पान ८ वर)

# शहराच्या भरीव विकास कामांना प्राधान्य देणार कॉंक्रिट रस्त्याचे आ.अग्रवालांच्याहस्ते भुमीपूजन

**धुळे, दि.१६ - शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणासह विविध भरीव व दर्जेदार कामांतून धुळे शहराच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. शहरातील रस्त्यांवर आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे व्हाइट टॉपिंग कॉंक्रिटीकरणासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यातून धुळे महानगर स्मार्ट आणि सुंदर करण्याचा प्रयतक सुरू आहे. यासाठी धुळेकर जनतेनेही साथ द्यावी, असे आवाहन शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी आज केले.**



आमदार अग्रवाल यांच्या हस्ते आज सायंकाळी शहरातील पांझरा नदीकाठावरील शिवाजी महाराज रोडवरील श्री सिद्धेश्वर गणपती मंदिर ते श्री स्वामी समर्थ केंद्रापर्यंतच्या व्हाइट टॉपिंग रस्ता कॉंक्रिटीकरणाचे भूमिपूजन झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महापौर मायादेवी परदेशी, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, उपमहापौर ज्योत्सना पाटील, महापालिकेतील भाजपच्या गटनेत्या किरण कुलेवार, माजी महापौर तथा नगरसेविका कल्पना महाले, नगरसेवक सुनील बैसाणे, नगरसेवक (पान ८ वर)

# धुळे शहरासह तालुक्यातील विकास कामांना गती खा.डॉ. शोभा बच्छावांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

**धुळे, दि.१६ - धुळे लोकसभेच्या खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्या विशेष प्रयतकातून आणि नागरिकांच्या सातत्यपूर्ण मागणीच्या अनुषंगाने धुळे लोकसभा मतदारसंघातील धुळे शहर व धुळे तालुका परिसरात विकासकामांचा वेग वाढला असून विविध महत्त्वाच्या कामांची प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. विकासाच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकत या कामांचे भूमिपूजन खा.डॉ. शोभा बच्छाव यांच्या हस्ते पार पडले.**

धुळे शहर आणि तालुक्यातील अनेक भागांमध्ये रस्त्यांची अवस्था खराब असल्याने नागरिकांना दैनंदिन वाहतुकीत अडचणींचा सामना करावा लागत होता. तसेच सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी आवश्यक असणाऱ्या सभामंडपांची मागणी दीर्घकाळापासून प्रलंबित होती. या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेत खा.डॉ. शोभा बच्छाव यांनी पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतला. परिणामी आज या विकासकामांचे भूमिपूजन होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.या अंतर्गत बांबुर्ले प्र. नेर येथे सभामंडप उभारणीचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच प्रभाग क्रमांक २ मधील पूजा प्रोव्हिजन परिसरात रस्ता कॉंक्रिटीकरण, प्रभाग क्रमांक मधील गोवर्धननगर येथे रस्ता कॉंक्रिटीकरण, तसेच धुळे शहरातील लक्ष्मीनगर येथे सभामंडप बांधण्याच्या कामाचे



भूमिपूजन करण्यात आले.या विकासकामांमुळे संबंधित परिसरातील नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध होणार असून वाहतुकीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. कॉंक्रिटीकरणामुळे रस्त्यांचे आयुष्य वाढणार असून पावसाळ्यात होणाऱ्या चिखल व खड्ड्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे. तसेच सभामंडप उभारणीमुळे सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी स्थानिक नागरिकांना हक्काचे ठिकाण उपलब्ध होणार आहे. यावेळी बोलताना (पान ८ वर)

## नंदनगरीत आजपासून भागवत ज्ञानयज्ञ कथा

नंदुरबार, दि.१६(प्रतिनिधी)- येथील जळका बाजार भागातील जयस्वाल परिवारातर्फे अधिक मासानिमित्त श्रीमद भागवत ज्ञानयज्ञ कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. जगदीश लक्ष्मण जयस्वाल यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या कथा सप्ताहाचा शुभारंभ रविवार दि. १७ मे रोजी सकाळी ९ वाजता ग्रंथ दिंडी यात्रेने होणार आहे. तसेच गुरुवार दि. २१ मे रोजी दुपारी ४:३० वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा (पान ८ वर)

# जनगणनेच्या कामास नकार दिला उपशिक्षिकेवर अखेर गुन्हा दाखल

**धुळे, दि.१६- शहरातील कै.भाऊसाहेब व्ही.टी.भोईटे प्राथमिक शाळा,रासकर नगर येथील उपशिक्षिकेला जनगणना प्रगणक, पर्यवेक्षक प्रशिणासाठी उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आलेले असतांना विना परवानगी गैरहजर राहिली. तसेच जनगणनेच्या कामास नकार दिल्याने मनपाचे सहा.आयुक्त तथा जनगणना अधिकारी किशोर यशवंत वाघ यांनी उपशिक्षिकेविरोधात जनगणना अधिनियम १९४८ चे कलम ११(१) अन्वये शासनाच्यावतीने धुळे शहर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदवला आहे.**

सहा.आयुक्त किशोर यशवंत वाघ यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, महापालिका हद्दीतील प्रभाग क्र.८,९,१० व १७ साठी जनगणना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अधिकारी म्हणून सरकारी निमसरकारी शालेय विभागातील कर्मचारी जनगणना प्रगणक आणि पर्यवेक्षक नियुक्त करण्याचा अधिकार शासनाने दिला आहे. त्या अनुषंगाने भारतीय जनगणना-२०२७ करीता कै.भाऊसाहेब व्ही. टी.भोईटे प्राथमिक शाळा, रासकर नगर धुळे येथील उपशिक्षिकेची जनगणना कायदा १९४८ चे कलम ५ अन्वये दि.२२ एप्रिल २०२६ रोजी नियुक्ती करण्यात आली. जनगणनेच्या प्रशिक्षणासाठी नवजीवन स्कूल येथे उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले असतांना उपशिक्षिका प्रशिक्षणाला विनापरवानगी गैरहजर राहिली. दि.२७ एप्रिल रोजी विचारणा केली असता उपशिक्षिकेने काम करण्यास नकार दिला. या संदर्भात खुलासा मागविण्यासाठी मुख्याध्यापिका यांना संपर्क साधला असता आपण बाहेर गावी असल्याचे सांगितले. उपशिक्षिकेला (पान ८ वर)



# आरती पवार व डॉ.दिपक शिंदे यांच्या प्रयत्नातून मोफत आरोग्य शिबीर संपन्न

**धुळे, दि.१६- प्रमोद नगर नकाने रोड येथे नगरसेविका आरती अरुण पवार व डॉ. दीपक शिंदे अंजना हार्ट केयर हॉस्पीटल साक्री रोड धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.**

याप्रसंगी महिला व पुरुषांची बेसिक तपासणी मधुमेह, रक्तदाब, थायरॉईड अशा विविध प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्या. शिबिरात प्रामुख्याने परिसरातील १५० ते २०० नागरिकांनी उत्स्फूर्तपने सहभाग नोंदवला. त्याचप्रमाणे एस.टी. महामंडळ संचलित एनसीएमसी कार्ड नोंदणी शिबिर घेण्यात आले त्यातही सुमारे ३०० जेष्ठ नागरिकांची व महिला भगिनींनी सहभाग नोंदवला.

# अतिक्रमितांना स्मशानभूमीची जागा संतप्त गवळी समाजाने निवेदन सादर

**धुळे, दि.१६- शहरातील स्टेशनरोड परिसरातील अतिक्रमण हटवून अतिक्रमणधारकांना धुळे तालुक्यातील चितोड येथील गट क्र.४५ चे क्षेत्र देणार असल्याचे समजताच विरशैव लिंगायत गवळी समाज बहुउद्देशीय मंडळ चितोड, ता.जि. धुळे च्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना अतिक्रमणधारकांना जागा देण्यात येवू नये. अशा आशयाचे निवेदन दिले.**

निवेदनात नमूद केले आहे की, धुळे तालुक्यातील चितोड येथील गट क्र.४५ चे एकुण क्षेत्र ३ हेक्टर २८ आर या क्षेत्रापैकी मागासवर्गीय स्मशानभूमीकरीता १ हेक्टर क्षेत्र,



गवळीस स्मशानभूमीकरीता १ हेक्टर ०.४आर क्षेत्र, व उर्वरित ०.२४ आर क्षेत्र या प्रमाणे स्मशानभूमीकरीता क्षेत्र वाटप करण्यात आले आहे. या क्षेत्र वाटपाची ७/१२ उताऱ्यावर नोंद आहे. सदर गटात कुठलेही क्षेत्र शिल्लक नाही. स्मशानभूमीकरीता देण्यात आलेली जागा स्टेशन रोडवरील अतिक्रमणधारकांना देण्यात येणार असल्याचे समजल्याने संतप्त गवळी समाजबांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठून जिल्हा प्रशासनाला निवेदन दिले. अतिक्रमणधारकांना जागा देण्याचे काम न थांबवल्यास गवळी समाजातर्फे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा (पान ८ वर)

# नंदुरबार जिल्ह्यातील खासदार-आमदारांची महत्वपूर्ण बैठक जिल्हा नियोजन भवनात संपन्न

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास योजना २०२५-२०४७ अंतर्गत जिल्हास्तरीय अमृतकाल रस्ते विकास आराखड्यासंदर्भात नंदुरबार जिल्ह्यातील खासदार व आमदारांची महत्त्वपूर्ण बैठक जिल्हा नियोजन भवन येथे संपन्न झाली. बैठकीत पुढील वीस वर्षांसाठी राज्याच्या रस्ते विकासाचे धोरण निश्चित करताना दुर्गम आदिवासी**



**भागांतील वाड्या-पाड्यांना मुख्य प्रवाहाशी जोडण्यावर विशेष भर देण्यात आल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश पालवे यांनी दिली आहे.**

बैठकीस खासदार गोवाल पाडवी, आमदार राजेश पाडवी, आमदार आमश्या पाडवी प्रत्यक्ष उपस्थित होते. तर आमदार विजयकुमार गावित, आमदार चंद्रकांत रघुवंशी, आणि आमदार शिरीष नाईक यांनी दृकश्राव्य प्रणालीद्वारे सहभाग नोंदविला. बैठकीस जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे, नंदुरबार सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश पालवे, शहादा सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मयुर वसावे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. शिंदे यांच्यासह विविध बांधकाम विभागांतील अधिकारी उपस्थित होते.

राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार करण्यात येणाऱ्या या योजनेत एक्सप्रेस वे, राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग तसेच इतर जिल्हा मार्ग यांचे निकष स्पष्ट करण्यात आले. सन २०४७ पर्यंत ७५० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व गावांना बारमाही रस्त्यांनी जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याशिवाय तीर्थक्षेत्रे, पर्यटनस्थळे, उद्योग केंद्रे, औद्योगिक वसाहती, रेल्वे स्थानके आणि ड्राय पोर्ट्सना उच्च दर्जाच्या रस्त्यांनी जोडण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

बैठकी दरम्यान लोकप्रतिनिधींनी सातपुडा आणि आदिवासी भागातील वाड्या-पाड्यांच्या रस्त्यांचा प्रश्न प्राधान्याने मांडला. मुख्य रस्त्यांइतकाच दुर्गम भागांतील संपर्क महत्वाचा असून जीआय मॅपिंगपेक्षा गावस्तरावरील प्रत्यक्ष सर्वेक्षण आवश्यक आहे, अशी भूमिका लोकप्रतिनिधींनी मांडली. राज्यातील प्रत्येक जिल्ह्याचे रस्ते नकाशे अवघ्या (पान ८ वर)



# अवैधरित्या अमली पदार्थांची वाहतूक दोन जण शहादा पोलिसांच्या ताब्यात

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- सुका गांजा विक्री करण्याच्या उद्देशाने मोटार सायकलवरून शिरपूरकडे वाहतूक करणारे दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडे एका मोठ्या पिशवीतून एकूण २० किलो ५६४ ग्रॅम वजनाचा सुका गांजा आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत ४ लाख, ८१ हजार २८० रुपये इतकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.**

या प्रकरणी सुशिल सुभा पावरा(वय ३०) रा. मोहिदा, ता. शिरपूर जि.धुळे. गजेंद्र जितेंद्र पावरा, (वय २१)रा. मोहिदा, ता. शिरपूर, जि. धुळे या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बेथेल कॉलनी परिसरात विकासकामे आ.रघुवंशींच्या हस्ते भूमिपूजन सोहळा

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- शहरातील प्रभाग क्र. १ मधील बेथेल कॉलनीमधील मुख्य रस्त्याचे नूतनीकरण तसेच जीर्णवस्था झालेल्या सार्वजनिक शौचालयाचे नव्याने बांधकाम करण्यात येणार आहे. या दोन्ही विकासकामांचे भूमिपूजन आ.चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.**

शहरातील बेथेल कॉलनीत अनेक दिवसांपासून रस्त्यांवर खड्डे पडलेले होते. त्यामुळे परिसरातील रहिवासी व वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत होता. परिसरात शैक्षणिक संस्था असल्यामुळे विद्यार्थी व त्यांच्या पालकांना देखील रस्त्यावरील खड्ड्यांचा त्रास होत होता. त्याचप्रमाणे शौचालयाची देखील जीर्णवस्था झाली होती. प्रभागातील नगरसेवक तथा माजी नगराध्यक्ष कुणाल वसावे व नगरसेविका ज्योती राजपूत यांनी आ.चंद्रकांत रघुवंशी, नगराध्यक्ष रतका रघुवंशी यांना सदरील बाब निदर्शनास आणून देत उपायोजना करण्याचे सुचविले होते.

आ.चंद्रकांतरघुवंशी,नगराध्यक्ष रत्ना रघुवंशी यांना प्रभागातील नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी बेथेल कॉलनीत तात्काळ नवीन रस्ता व शौचालय बांधकामाच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या. पालिकेत तसा ठराविक करण्यात आला होता. शुक्रवारी सायंकाळी आ.चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते नवीन रस्ता व शौचालय बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,43,600 रु.+3% GST
सोने- 24 K -1,56,800 रु.+3% GST
चांदी- 2,70,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# दुहेरी खुनातील महतोला पो. कोठडी नातेवाईकांनी मृतदेह बिहाराकडे नेले

**शिरपूर दि.१६ (का. प्र .)- सख्ख्या आई वडिलांचा डोक्यात दगडी खलबत्ता घालून खून केल्याच्या गुन्ह्यात संशयित चंदन गंगा महतो याला न्यायालयाने १८ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी दिली.**

मांडळ शिवारात चंद्रमौळी सोसायटीत १५ मेस दुपारी ही घटना घडली होती. काही तासांपूर्वी बिहारमधून परत आलेल्या गंगा झिरीलाल महतो व रंजूदेवी महतो यांच्या डोक्यात खलबत्ता घालून मुलगा चंदन महतो याने खून केला. पोलिसांनी चंदनला अटक केली. पत्नीसमोर वडील वारंवार अपमान करीत असल्यामुळे खून केल्याचे चंदन याने पोलिसांना सांगितले.

१६ मे रोजी चंदन महतो याला न्यायालयासमोर हजर केले असता तीन दिवसाची पोलिस कोठडी देण्यात आली.

मृत महतो दांपत्याचे १६ मेस सकाळी शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात शव विच्छेदन करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी बिहार येथील महतो कुटुंबाचे नातलग दोघांचे मृतदेह घेऊन दरभंगा येथे रवाना झाले.

जांभुळ ज्युस मिळेल




नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
संकेत नित्या फार्म
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३१६, २३८३१६

# देवभाने येथे अधिकाऱ्यांकडून पाहणी शेतकऱ्यांनो शेडनेटकडे वळा: भदाणे

**धुळे, दि.१६- भाजपा महायुती सरकाने शेतकऱ्यांसाठी विविध योजना आणल्या आहेत. शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीकडे वळावे. शेडनेट शेती अधिक फायद्याची आहे. यासाठी पन्नास टक्के अनुदान उपलब्ध करून दिले आहे. बदलत्या हवामानामुळे शेडनेट शेतीतून उत्पादकता वाढते. उत्पादनाची गुणवत्ता वाढते. येणाऱ्या काही वर्षांत धुळे ग्रामीणमध्ये सिंचनाचे क्षेत्र वाढणार आहे. त्यासाठी आमदार राम भदाणे यांचे अविरत प्रयत्न सुरु असल्याचे जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे यांनी सांगितले.**



धुळे तालुक्यातील देवभाने शिवारात उद्यान पंडित नथ्थू महाजन यांच्या शेतात शासनाच्या अनुदानातून उभारण्यात आलेल्या शेडनेटची जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे, जिल्हा मुद्रांक अधिकारी अनिल पुरे प्रांताधिकारी रोहन कुवर व तहसिलदार अरूण शेवाळे यांनी पाहणी केली. यावेळी माजी अध्यक्ष भदाणे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. सामाजिक कार्यकर्ते योगेश पाटील, अनिल माळी, नाना माळी, धीरज साळुंके, अजय देसले, दुर्गेश पाटील आदी शेतकरी उपस्थित होते.

यावेळी माजी अध्यक्ष भदाणे म्हणालेत, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतर्गंत व कृषी विभागाच्या एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातून उद्यानपंडीत नथ्थू महाजन यांना चौदा लाखाचे अनुदान मंजूर झाले. या अनुदानातून त्यांनी शेतात अद्ययावत शेडनेट उभारले आहे. ठिबक सिंचनाची व्यवस्था केलेल्या या शेडनेटमध्ये भाजीपाला व फुलशेतीचे उत्पादन घेतले जाणार आहे. यामुळे वर्षभर उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होऊन शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य मिळणार आहे. उद्यानपंडीत महाजन यांच्या प्रयोगशीलतेचे कौतुक करून इतर शेतकऱ्यांनीही यांचा आदर्श घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. शेडनेटची रचना, पाणी व्यवस्थापन, वाफे तयार करण्याची पद्धत व लागवडीचे नियोजन याबाबत अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती घेतली.



# अहिल्यापूर येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयाच्या दहावी परीक्षेतील गुणवंतांचा गुणगौरव

**शिरपूर, दि.१६- तालुक्यातील अहिल्यापूर येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयाच्या दहावी परीक्षेतील गुणवंतांचा गुणगौरव करण्यात आला.**

विद्यार्थ्यांनी एस. एस. सी. बोर्ड परीक्षा २०२५- २६ मध्ये उज्वल यश संपादन करत १०० टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे.

विद्यालयात तसेच थाळनेर केंद्रात प्रथम क्रमांकाची मानकरी अनुष्का प्रदीपसिंग गिरासे ९४ टक्के गुण मिळवून ठरली आहे. श्रेया नवनाथ जावळे ९२.८० टक्के गुण द्वितीय क्रमांक, सम्बुद्धी शशिकांत सावळे ९२.४० टक्के तृतीय क्रमांक, वैभव रतिलाल गिरासे ९२.२० टक्के चतुर्थ क्रमांक, पियुष भटेसिंग गिरासे ९१.४० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक पटकावला. गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आर. सी. पटेल मेन बिल्डिंग शिरपूर येथील राजगोपाल भंडारी हॉल मध्ये संपन्न झाला.

सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, खजिनदार बबनलाल अग्रवाल, संचालक अतुल भंडारी, संचालक विजय भंडारी, सीईओ डॉ.उमेश शर्मा, अर्कॅडमीक इन्चार्ज पी. व्ही.

पाटील, मुख्याध्यापक व्ही. बी. चौधरी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थी व पालक यांनी कौतुक केले.

# क्रेडाईचे नॅटकॉन अधिवेशन भारतातच घेण्याचा निर्णय

**धुळे, दि.१६-कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया (क्रेडाई ) तर्फे आयोजित करण्यात येणारे प्रतिष्ठित नॅटकॉन २०२६ अधिवेशन आता भारतातच आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. यापूर्वी हे अधिवेशन नेदरलँड्समधील ॲमस्टरडॅम येथे १३, १४ आणि १५ ऑगस्ट रोजी होणार होते. देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या देश प्रथम आणि परदेश दौरे टाळण्याच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत क्रेडाईने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले आहे. या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणावर परकीय चलनाची बचत होणार असून भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.**

CREDAI
Confederation of Real Estate Developers' Associations of India

नॅटकॉन हे क्रेडाईचे २४ वे वार्षिक अधिवेशन असून देशभरातील एक हजारांहून अधिक प्रतिनिधी, बांधकाम व्यावसायिक, डेव्हलपर्स, गुंतवणूकदार आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर या कार्यक्रमात सहभागी होत असतात. या अधिवेशनाच्या माध्यमातून रिअल इस्टेट क्षेत्रातील नव्या संधी, धोरणे, तंत्रज्ञान, गुंतवणूक आणि विकास यावर व्यापक व साधकबाधक चर्चा केली जाते. पश्चिम आशियातील बदलत्या भू-राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारतात कार्यक्रम घेण्याचा निर्णय हा राष्ट्रीय हितासाठी सकारात्मक आणि प्रेरणादायी असल्याचे विविध स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे. या अधिवेशनासाठी भारतातील यजमान शहराची घोषणा तसेच सुधारित कार्यक्रमपत्रिका लवकरच जाहीर केली जाणार असल्याची माहिती क्रेडाईच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

नॅटकॉन २०२६ आता भारतात आयोजित होणार आहे. ॲमस्टरडॅम येथील प्रस्तावित कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत, परकीय चलन बचतीला प्रोत्साहन मिळणार आहे, भारतीय बांधकाम व व्यावसायिक क्षेत्राला सकारात्मक संदेश मिळणार, आत्मनिर्भर भारत संकल्पनेला बळकटी मिळणार आहे.

देशहिताला प्राधान्य देत भारतात अधिवेशन आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे भारतीय उद्योग, पर्यटन, हॉटेल आणि स्थानिक व्यवसाय क्षेत्राला मोठा लाभ होईल असे प्रतिपादन क्रेडाई धुळे चे अध्यक्ष सुमीत बोरसे यांनी केले.

क्रेडाई धुळेतर्फे देखील या निर्णयाचे स्वागत करण्यात आले असून, भारतीय बांधकाम क्षेत्र देशाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत असल्याचे नमूद करण्यात आले. राष्ट्रीय हित, आर्थिक प्रगती आणि स्थानिक उद्योगांना चालना देण्यासाठी अशा प्रकारचे निर्णय प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# मुकटी येथील किरण सैंदाणे यांचे एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश

**मुकटी, दि.१६- धुळे तालुक्यातील मुकटी येथील कै.दादासाहेब हरचंद बडगुजर सार्वजनिक वाचनालयातील अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या किरण विजय सैंदाणे-पाटील याने अहोरात्र मेहनत घेऊन एमपीएससी परीक्षेत यश संपादन केले आहे. नुकतीच त्यांची मुंबई बांधकाम विभागात नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल दि.१६ मे रोजी वाचनालयाच्या वतीने त्यांचा मुकटी पं.सं. सदस्य राजेंद्र शर्मा यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.**

या अगोदरही या वाचनालयाच्या अभ्यासिकेत अभ्यास करून अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.किरण सैंदाणे याचा आदर्श घेऊन इतरांनीही आपली यशस्वी वाटचाल करावी तसेच वाचनालयाच्या वतीने सर्व सुख सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयतक होत असल्याचे अध्यक्ष प्रा ईश्वर बडगुजर यांनी सांगितले. अपयश ही यशाची पहिली पायरी असून



अपयशाने खचून न जाता नव्या उमेदीने अभ्यास करून आपले लक्ष्य साध्य करण्याचे आवाहन राजेंद्र शर्मा यांनी यावेळी केले. खेडेगावातील असल्याचे मनात न्यूनगंड न ठेवता प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अभ्यासातील सातत्यामुळे आपण यश संपादन केल्याचे किरण सैंदाणे यांनी यावेळी सांगितले. दीपक पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक ईश्वर बडगुजर यांनी केले तर आभार प्रदर्शन भूषण बडगुजर यांनी केले . यावेळी याच अभ्यासिकेतील लोटन पारधी व राजेंद्र जगदाळे यांनीही अभ्यास करून सैनिक भरतीत यश संपादन केल्याबद्दलही त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. अभ्यासिकेत अभ्यास करणारे विद्यार्थी व वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बुरझड शिवारात शॉर्टसर्किटमुळे आग एक गाय ठार, दुसरी जखमी, चारा खाक

**धुळे, दि.१६- धुळे तालुक्यातील बुरझड शिवारातील सावळे जंगल परिसरात शॉकसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत चारा गोठ्यासह दोन गायी जळाल्याची दुर्दैवी घटना घडली. या आगीत एक गाय जागीच मृत्यूमुखी पडली असून दुसरी गाय सुमारे ऐंशी टक्के भाजली आहे. तसेच सहा टँक्टर ट्रॉली चारा जळून खाक झाला असून सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, गट क्रमांक २५९/३ मधील शेतकरी सचिन वसंत पाटील रा. बुरझड यांच्या शेतातच गाय गोठा होता. दि. १४ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास परिसरात वाऱ्याचा भोवरा फिरत असताना वीज पोलवरील तारांमध्ये शॉकसर्किट झाले. त्यातून पडलेल्या ठिणग्यांमुळे गोठ्याजवळील चारा व मक्याच्या पिकाला आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण करत गोठा, चारा भस्मसात केला. या आगीत दोन दुग्धजन्य गायी आगीत सापडल्या. त्यापैकी एक गाय जागीच मृत्यूमुखी पडली, तर दुसरी गाय गंभीररीत्या भाजली असून तिच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली. घटनेनंतर परिसरातील ग्रामस्थांनी आग विझविण्यासाठी मोठी धावपळ केली.

घटनेची माहिती मिळताच बुरझड तलाठी यांनी घटनास्थळी भेट दिली. दुपारपर्यंत पंचनाम्याचे काम सुरू असल्याची माहिती मिळाली.नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत व भरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांत वडणे-निकुंभे-बुरझड परिसरात विजेच्या शॉकसर्किटमुळे आगीच्या घटना वाढल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यापूर्वी परिसरातील लोंबकळणाऱ्या वीजतारा, ट्रान्सफॉर्मर व विद्युत यंत्रणा तातडीने दुरुस्त कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. विजेच्या प्रवाहामुळे वारंवार लागत असलेल्या आगीमागील नेमके कारण शोधून महावितरण कंपनीने शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी भावना परिसरातून व्यक्त होत आहे.

## शहाद्यात पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान

शहादा, दि.१६ (का.प्र.) - भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभरात राबविण्यात येत असलेल्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान अंतर्गत शहादा शहर व नंदुरबार जिल्हा प्रशिक्षण वर्ग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शहादा येथील व्हीएसएस लॉन्स येथे हा कार्यक्रम अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाला.या प्रशिक्षण वर्गादरम्यान प्रमुख अतिथी आणि मार्गदर्शकांनी उपस्थित भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला. पक्षाचे संघटन अधिक मजबूत करणे, राष्ट्रहित जोपासणे आणि पक्षाची लोककल्याणकारी विचारधारा जनमानसात रुजविणे याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यकर्त्यांमध्ये राष्ट्रभक्ती व राष्ट्रीयत्वाची भावना अधिक दृढ व्हावी, तसेच भाजपा परिवाराची विकासाभिमुख कार्यशैली आणि जनहिताचे विचार समाजातील तळागाळापर्यंत पोहोचावेत, असे आवाहन यावेळी करण्यात आले.या प्रसंगी आमदार राजेश पाडवी, शहाद्याच्या उपनगराध्यक्षा सौ. माधवी मकरंद पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष निलेश माळी, तसेच भाजपाचे शहादा शहराध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी आदींसह जिल्ह्यातील व शहरातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणपुले दत्त मंदिरात दत्त याग कार्यक्रम

**धुळे, दि.१६- शहरातील खोल गल्लीतील प्राचीन काळापासून असलेल्या श्री गणपुले दत्त मंदिर संस्थानात अधिक जेष्ठ महिन्याच्या मंगलमय पर्वाच्या निमित्ताने अलौकिक दिव्य यज्ञीय अनुष्ठान असणाऱ्या पाच दिवसांच्या भव्य श्री दत्त याग कार्यक्रमाचे आयोजन विश्वस्त मंडळा तर्फे करण्यात आले आहे.**



सोमवार दि.१८ मे रोजी सकाळी नऊ वाजता ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत दत्त याग कार्यक्रमाचा शुभारंभ होत असून दि.२२ मे रोजी पूर्णाहुती ने दत्त याग कार्यक्रमाची सांगता होईल. पाच दिवसांच्या या धार्मिक कार्यक्रमात लघुरुद्र अभिषेक, दत्त गायत्री मंत्र पठण, गुरुचरित्र पारायण, यज्ञकुंड हवन, नित्य आरती इ विविध धार्मिक कार्यक्रमांचा समावेश आहे. धुळ्यातील सुपरिचित जेष्ठ पुरोहित श्री हेमंत उर्फ बाळू जोशी गुरुजी ब्रह्मवृंदांसह दत्त याग कार्यक्रमाचे पौरोहित्य करणार आहेत. दि.२३ मे रोजी दुपारी बारा वाजेपासून दत्त याग सोहळा समारोपा निमित्ताने महाप्रसाद (भंडारा) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक जेष्ठ महिन्यात आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसांच्या श्री दत्त याग कार्यक्रमात भाविकांनी सहभागी होऊन श्री दत्त गुरूंच्या दर्शनाचा व प्रसादाचा लाभ लाभ घेण्याचे आवाहन श्री गणपुले दत्त मंदिर संस्थानच्या अध्यक्षा धनश्री गरुड व विश्वस्त मंडळा तर्फे करण्यात आले आहे.

# उन्हात रांगेत उभ्या लाभार्थ्यांना पाण्याचा दिलासा; राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांचा उपक्रम

**नवापूर, दि.१६ प्रतिनिधी- नवापूर शहरात बांधकाम कल्याकारी मंडळ विभागामार्फत लाभार्थ्यांना भांड्यांच्या संचाचे वाटप सुरू असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी शहरासह तालुक्यातील अनेक नागरिक सकाळपासूनच बांधकाम कल्याणकारी मंडळ विभागाच्या आवारात मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक लगत असलेल्या या कार्यालय परिसरात सकाळपासून लाभार्थ्यांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसून आल्या.**

सध्या नवापूर शहरात उन्हाचा पारा चांगलाच वाढला असून कडक उन्हामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. विशेषतः महिला लाभार्थी भांड्यांचा संच मिळवण्यासाठी तासन्तास उन्हात उभ्या राहत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. या महिला व ज्येष्ठ नागरिकांची होत असलेली गैरसोय राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते भरतभाऊ गावीत यांच्या निदर्शनास आली. ही परिस्थिती लक्षात घेत भरतभाऊ गावीत



तसेच लोकनियुक्त नगराध्यक्ष जयवंत जाधव,उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे,युवाउद्योजक धनजय गावीत यांच्या नेतृत्वाखाली लाभार्थ्यांसाठी तात्काळ थंडगार फिल्टर पाण्याची व्यवस्था करण्यात आली. बांधकाम कल्याकारी विभागाच्या आवारात पाण्याचे बॅरल लावून लाभार्थ्यांना स्वच्छ व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले.

यावेळी नगरसेवक मनोहर गावीत, शिरीष प्रजापत,वतन अग्रवाल आणि राजू आगळे यांनी स्वतः उपस्थित राहून लाभार्थ्यांना पाण्याचे वाटप केले. भर उन्हात रांगेत उभ्या असलेल्या नागरिकांना या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाला.अचानक करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमामुळे लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त करत पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. उन्हामुळे खूप त्रास होत होता, मात्र पाण्याची व्यवस्था झाल्याने मोठा आधार मिळाला, अशी भावना अनेक महिलांनी व्यक्त केली.

सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या अडचणीची तात्काळ दखल घेऊन केलेल्या या उपक्रमाचे शहरभर कौतुक होत आहे. राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी केवळ राजकारण न करता नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे लक्ष दिल्याचे या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले.

# दहावीच्या परीक्षेत हिमांशू टाकणे चे यश

धुळे, दि.१६- धुळे येथील राजे छत्रपती संभाजी माध्यमिक विद्यालयातील शाळेचा विद्यार्थी ची. हिमांशू रवींद्र टाकणे याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेत ९२ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केलेले आहे.

हिमांशू याने सुरुवातीपासूनच अभ्यासात सातत्य ठेवले होते. कोणतेही प्रकारच्या बाह्य दडपणाशिवाय केवळ जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्याने हे यश मिळवले आहे. त्याने आपल्या यशाचे श्रेय राजे छत्रपती संभाजी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मा.शर्मिला शिंदे व शाळेचे सर्व शिक्षक, वडील रवींद्र टाकणे, आई साक्षी टाकणे आजी पद्माक्षी पंढरीनाथ टाकणे बहीण निलेशा टाकणे तसेच मार्गदर्शक यांना दिले. त्याच्या यशाबद्दल नातेवाईक आणि मित्र परिवाराकडून त्याच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# शहादा पालिकेतर्फे बायोमायनिंग प्रक्रिया केलेले सेंद्रिय खत शेतकऱ्यांसाठी उपलब्ध

**शहादा,दि.१६(प्रतिनिधी)- शहरातील घनकचरा व्यवस्थापन आणि डंपिंग ग्राउंडची पावसाळ्यापूर्वी नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी पाहणी केली. यावेळी ओल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करून त्यापासून सेंद्रिय खत तयार करण्यात आले. हे खत आता शेतकऱ्यांसाठी उपलब्ध झाले असून पालिकेच्या स्वच्छता विभागाशी संपर्क साधून शेतकऱ्यांनी खत घेऊन जावे असे आवाहन नगराध्यक्ष श्री पाटील यांनी केले.**



शहरातील घरोघरी संकलित होणारा ओला व सुका कचरा दोंडाईचा रस्त्यावरील डंपिंग ग्राउंडवर आणला जात असून तेथे त्याचे योग्य प्रकारे विलगीकरण केले जात आहे. ओल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करून त्यापासून सेंद्रिय खत तयार करण्यात आले असून हे खत आता शहादा नगर परिषदेतर्फे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. सेंद्रीय खतांमुळे उत्पादनात वाढ आणि सकसता येते असेही सांगण्यात आले.

* धुळे, दि.१६- देवपूर परिसरातील नागरिक मागील सहा दिवसांपासून पाण्यापासून वंचित आहे. जिल्ह्यात पाण्याचा साठा मोठ्याप्रमाणावर असतांना मनपाच्या ढिसाळ नियोजनाचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.

# डिप्लोमा इन टेक्सटाईल टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड

**शिरपूर, दि.१६- श्री विलेपार्ले केळवणी मंडळ संचलित एन.एम.आय.एम.एस. अभिमत विद्यापीठ अंतर्गत सेंटर फॉर टेक्सटाईल फंक्शन्स महाविद्यालयातील डिप्लोमा इन टेक्सटाईल टेक्नॉलॉजी कोर्सच्या २०२५-२६ अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटद्वारे यशस्वी निवड झाली असून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.**

आपल्या ब्रॅण्ड्सची गुणवत्ता आणि मुल्याद्वारे जागतिक बाजारपेठेत वर्चस्व असलेल्या विविध नामांकित टेक्सटाईल कंपन्यांनी कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह दरम्यान विद्यार्थ्यांची निवड केली. यात रिलायन्स इंडस्ट्रीज, मुंबई येथे विवेक पाटील, आकाश कोळी, वैभव गिरासे, यश सोनवणे आणि अक्षयकुमार चौधरी यांची तसेच ए.वाय.एम. सिंटेक्स पालघर येथे हर्षल पाटील, निखिल शिंपी, आनंद माळी, दिलीप पावरा, तेजस वडिले आणि मंगेश बंजारा यांची वार्षिक ३.५० लाख रुपये वेतनावर निवड करण्यात आली. पुणे येथील सेंचुरी-एन्का लिमिटेड येथे रोहन पाटील आणि रुपेश पाटील यांची वार्षिक ३.२४ लाख वेतनावर तर भरूच येथील आदित्य बिर्ला ग्रुपच्या राजश्री पॉलिफिल येथे हेमंत गिरासे आणि प्रीतम पाटील यांची वार्षिक लाख वेतनावर यशस्वी निवड करण्यात आली. दिपक पाटील, हर्षल पाटील, शुभम गवळी, विशाल परदेशी, अबुतल्हा मुजावर, मुस्कान कुरेशी आणि रोनक पाटील यांची टेक-फॅब इंडिया, भोपाल येथे वार्षिक ३ लाख वेतनावर तसेच संदीप पावरा, गौरव महाजन, मोक्षविद्या रामोळे आणि देवेंद्र राजपूत यांची खुशपाल ग्रुप, मुंबई येथे वार्षिक २.८४ लाख वेतनावर निवड करण्यात आली. बांसवारा सिन्टेक्स, गुजरात येथे चेतन पाटील आणि शिवम राजपूत यांची वार्षिक २.५ लाख वेतनावर यशस्वी निवड करण्यात आली.

निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे एस. व्ही. के. एम. अध्यक्ष तथा एन.एम.आय.एम.एस. अभिमत विद्यापीठाचे कुलपती माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, संस्थेचे सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, शिरपूर कॅम्पसच्या प्रभारी सौ. रिता पटेल, शिरपूर कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील, सी.टी.एफ. चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय शिवणकर, ट्रेनिंग अँड प्लेसेन्ट समन्वयक प्रा. रणजित तुरुकमाने, सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.









## शब्दकोडे क्रमांक : २३६६



**आडवे शब्द :** १.महाराष्ट्रातील एक राजकीय पक्ष ३. मनासारखे वागणार ६. मोकळीक ८. गोंडस, हुशार ९. शेंगांची साल ११. रांग १३. लेखणी १५. रव्यासारखा दाणेदार १६. हाक, गर्जना २०. खरे नसलेले २१. नवरा २३. कैफात आलेला २७. नूतन २९. माल वाहून नेणारा ३०. कैफात उधळलेला ३२. देह ३५. कुटिल डाव ३६. भीती ३८. अंधार ४०. अतिरेक ४२. गरज ४४. थंड ४६. हिंदीत- औषध ४७. नऊ ४९. समूह ५०. सैर ५२. छप्पर ५३. भित्रा ५६.प्पग- उलट लिहा ५८. नाडी ५९. वधू ६०. मालवणी बोलीत-पती ६१ . डॉ.बाबा आंबेडकरांच्या पत्नी **उभे शब्द :** १.शिकार करणारा २. सुश्रुषा ३. एक प्रकारचा सुती कपडा ४. सन- उलट लिहा ५. व्यवस्थित ६. बाष्प ७. वर्तुळ ८. वर्ष १०. कालवण १२. पक्ष्यांचे निवास स्थान १३. गुरांचा समूह १४. वडिलांचा भाऊ १७. सवय १८. लीन १९. हिंदीत - आम्ही २०. झाडाचा मुख्य गाभा २२.एक म्हण " पळसाला पाने ** " २४. तुकडी २५. दर्जा २६. चौक २८. दिवा तेवत ठेवण्याचे काम करते ३०.लाटणी ३१. सूट** - एक जोड शब्द ३३. वंदन करण्यासाठी आदराने वाकलेला ३४. कष्ट ४३. एक चर्म वाद्य ४५. नौका ४७. किराणा मालाचे जिन्नस मिळण्याचे ठिकाण ५१. पोट - हिंदीत ५२. छत ५४ ** बॉस- शाहरुख खान, जूही चावला यांचा एक सिनेमा ५५.एक चतुर्थांश हिस्सा ५७. माता

### शब्दकोडे क्रमांक : २३६५ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | मा | न | ■ | चो | ■ | सा | व | ■ | ध्या | ■ | चं |
| रा | ज | ■ | व | र | ण | ■ | सा | र | स | बा | ग |
| स | ■ | ख | रा | टा | ■ | श | ह | र | ■ | रा | ■ |
| त | फा | व | त | ■ | वा | ■ | त | ■ | ख | ■ | प |
| ■ | व | ट | ■ | वि | व | र | ■ | शी | त | ल | ■ |
| ख | डा | ■ | ना | ■ | ट | मा | ट | र | ■ | ग | म |
| त | ■ | र | सा | त | ळ | ■ | व | ■ | मे | ■ | ट |
| रा | व | ण | ■ | डा | ■ | म | ट | र | ■ | ना | का |
| ना | र | ■ | व | खा | र | ■ | वी | ■ | श | ह | ■ |
| क | ■ | भे | ळ | ■ | ब | र | त | न | ■ | क | प |
| ■ | सा | द | ■ | वा | र | स | ■ | ग | दा | ■ | रा |
| चा | ल | ■ | वि | डा | ■ | ना | ला | ■ | व | रा | त |




# बहर




प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

विश्वाच्या कल्याणासाठी छत्रपतींच्या स्वराज्याची मुद्रा श्रेष्ठ अशी आहे.यामुद्रेतून भविष्यातील ध्येय आणि हेतू स्पष्ट झाला आहे. मुद्रेतील प्रत्येक शब्द विचारपूर्वक मांडला आहे. दस्तऐवजाचा अधिकृतपणा दर्शविणारे राजचिन्ह म्हणजे मुद्रा होय. राजमुद्रा म्हणजे ऑफिशिय लस्टॅम्प होय. हुकूम, आज्ञा, दान, आग्रहार, नियुक्तीपत्रे या अधिकृत दस्तऐवजांवर राजमुद्रा उमटवण्यात येत असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किर्तीचे गुणगान त्यांच्या राजमुद्रेत वर्णिले आहे. छत्रपतींनी स्वराज्याच्या शासन व्यवस्थेमध्ये स्वतंत्र स्वराज्य मुद्रेचा वापर करून पारदर्शकता आणली.



## स्वराज्यमुद्रा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेवरील मजकूर हा संस्कृतमध्ये आहे. तो खालीलप्रमाणे आहे:

**"प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥**
**शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥"**

**याचा मराठीत अर्थ:**

"ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र (कोर) कलेकलेने वाढत जातो आणि साऱ्या विश्वासाठी वंदनीय होतो, तशीच शहाजीराजांचे पुत्र शिवाजी महाराज यांची ही मुद्रा आणि त्यांचे स्वराज्य वाढत जाईल. हे राज्य केवळ लोकांच्या कल्याणासाठीच प्रकाशमान होईल."

**सरकारी महत्व-** छत्रपतींनी स्वराज्यमुद्रेच्या माध्यमातुन राज्यकारभारातील कागदपत्रांना सरकारी महत्व पाप्त करून देण्याचे सूत्र जगाला दिले. प्रशासनातील महत्वाचा घटक म्हणून स्वराज्य मुद्रा अधोरेखीत केली. या मुद्रेवरून राजा आणि राज्ययांची ओळख होतअसे. प्रत्येक महत्वाच्या निर्णयावर व पत्रव्यवहारावर मुद्रा उमटविली जात असल्यामुळे राज्यकारभारात एकप्रकारची सत्यता व पारदर्शकता येत असे. स्वराज्य हे रयतेचे शासन आहे हे या मुद्रेवरून स्पष्ट झाले.

**मुद्रा एकमेवा व्दितीय-** अखिल भारत देशामध्ये छत्रपतींच्या स्वराज्यमुद्रेच्या तोडीची एकही मुद्रा नाही एवढीही एकमेवा व्दितीय आहे. मुद्रेतील आशय भव्य व दिव्य आहे. विश्ववंदिता हे पदफारच महत्वाचे आहे. हे स्वातंत्र्याचे प्रतिक आहे. विश्वाची शांतता आणि सुख हे सर्व जगाला संतुष्ठ करणारे आहे. सर्वांचे मंगल करणारी, विलक्षण असणारी, सर्वांच्या आदराला पात्रएवढा पवित्र व विलक्षण आशय यामुद्रेत भरलेला आहे. रयतेचे कल्याण हा या मुद्रेचा हेतू आहे. ही स्वराज्याची मुद्रा छत्रपती शिवाजी महाराजांना वडिल शहाजीराजे यांनी बनवून दिली. छत्रपती ही मुद्रा वयाच्या १२ वर्षापासुन वापरत असत. यामुद्रेतुन निघणारा अर्थ आणि त्यातुन स्वत:वर येणारी जबाबदारीत यांनी आयुष्यभर निभावली.

**पहिले निर्णायक पत्र-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेचे पहिले निर्णायक पत्र दि. २८/१/१६४६ यातारखेचे आहे. वयाच्या सोळाव्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांसमोर नवे स्वराज्य निर्माण करण्याचा आराखडा राजमुद्रेस कट तयार होता. रांझेगावच्या बाबाजी पाटील याला दिलेल्या शिक्षेच्या पत्रावर शिवराज मुद्रा प्रथम आढळते. राजमुद्राही प्रशासनाचा महत्वाचा भाग असून यावरून राजा आणि राज्याची ओळख होत असते. एकसंघ स्वराज्यासाठी व सर्वसामान्यांच्या कल्याणासाठीही राजमुद्रा क्षेष्ठ ठरली. सर्वसामान्यांचे हित हेच स्वराज्याचे ध्येय होते आणि ते सिध्दही झाले.

**राजमुद्रेचा आशय-**
**प्रतिपच्चंद्रलेखेववर्धिष्णुविश्ववंदिता !**
**शाहसूनोःशिवस्यैषामुद्राभद्रायराजते !!**

या क्षेष्ठतम अशा राजमुद्रेचा वापर छत्रपती शिवाजी महाराजांनी केला. या राजमुद्रेचा आशय तो असा प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे शहाजीपुत्र शिवरायांची सत्ता दिवसेंदिवस वाढत जावो आणि ती विश्व वंदिता होवो. ही मुद्रा भले करण्यासाठी विल्लसित होवो स्वराज्य स्थापनेच्या प्रारंभपासुनच छत्रपतींनी या मुद्रेचा वापर कागदपत्रावर केला.

प्रस्तुत स्वराज्य मुद्रेत पुढील प्रतिज्ञा आढळून येते.

शहाजीराजे यांचे सुपुत्र छत्रपती शिवाजी महाराज यांचीही मुद्रा आहे.

ही मुद्रा लोककल्याणार्थ शोभत आहे.

चंद्रकोर जसी वाढत जाते तशी ही मुद्राही अभिवृद्धी पावणार आणि चंद्रकोर जशी लोक पूजित होते. तशीच मुद्राही सर्वसामान्य होणार.अशाप्रकारे अतिशय सुंदर मजकूर या स्वराज्यमुद्रेत आहे.

**मुद्रेची भाषा-** छत्रपती शिवाजी महाराजांची मुद्रा संस्कृत भाषेत आहे. संस्कृतच्या वाढीसाठी यातून खूप मोठी चालना मिळाली. संस्कृत भाषेचे जतन व संर्वधन यातुन झाले.

**मुद्रेतील आदरभाव-** शहाजीराजे यांचे विचार विश्वकिती श्रेष्ठदर्जाचे होते हे यामुद्रेवरून लक्षात येते. राजमुद्रेत प्रथमतःछत्रपतींचे वडिल शहाजीराजे भोसले यांचे नाव आहे. शासन व्यवस्थेमध्ये शहाजीराजे यांचा आदर्श व त्यांचे पाठबळ नेहमीच मिळाले आहे. त्यांच्या या आदरभावातून राजमुद्रेला खूपमोठी बळकटी आलेली आहे.

**मुद्रेतील संदेश-** प्रजेचे कल्याण व सर्वसामान्यांचे हित हे यामुद्रेतून स्पष्ट होते. स्वराज्य हे न्यायाचे राज्य आहे, जो अन्याय करेल त्याला कडक शासन होत असे.छत्रपतींचे स्वराज्य हे रयतेचे शासन होते. राजमुद्रा ही लोककल्याणाची होती यातुन क्रांतीकारी बदल घडून आले व शासन सर्वश्रेष्ठ बनले.

**मुद्रेचा वापर-** कार्यालयीन कामकाजाचा भाग म्हणुन स्वराज्याच्या कार्यालयातून एखादे पत्र लिहिले जायचे. त्यावेळी मुद्राही पत्राच्या माथ्यावर उमटविली जातअसे. तर एखादे पत्र नातलग वडिलधारी व्यक्ति, साधू, संत यांना पाठविले जात असे. तेव्हा शिवमुद्राही पत्राच्या पाठीमागे उमटविली **(पान ६ वर)**

# ...तो आला आणि अंधार उजळून गेला...!

सगळ्या गोष्टी अगदी व्यवस्थित करायची सवय असणाऱ्या स्वरूप ने आपल्या बेड शेजारील टेबल वरच्या नोटपॅड वर लिहिलेल्या नोंदिकडे परत एकदा अगदी शेवटची नजर टाकली.

एक ,दोन ,तीन असे इंग्रजीत आकडे लिहून त्या पुढे इंग्रजीत सुवाच्य अक्षरात लिहिलेल्या यादीत काही विसरले तर नाही ना ? याची खात्री करून घेतली.

बाहेरचा मुख्य दरवाजा नीट लावला होता. बाहेरच्या दरवाज्यावर उद्या दुध नको अशी चिठ्ठी लिहिली होती. घरातील सगळे नळ नीट बंद केले होते. उगाच एखादा नळ चालू राहिला तर त्याच्या आवाजाने शेजारच्या सदनिकेतील कोणी ठणाणा करत येऊ नये. आता संध्याकाळचे सात वाजले होते. उद्या कमीत कमी दुपारचे - पर्यंत तरी कोणीही येऊन बेल मारू नये अशी काळजी त्याला घ्यायची होती. बाहेरच्या जेवायच्या टेबलावर त्याने चिट्ठी लिहून ठेवली होती. त्याच्या आई वडिलांसाठी. ते तिकडे दूर सांगलीला होते. पण हे सगळे झाले म्हणजे ते येणारच ..त्यांना काहीही त्रास नको व्हायला. ..पाण्याचा ग्लास बेड शेजारी होताच. ..मोबाईल बंद केला होता.

बाहेरचा दिवा बंद करायचा . बरोबर रात्री वाचता ,शेजारच्या बाटलीतील सगळ्या झोपेच्या गोळ्या खायच्या आणि शांत पणे झोपेच्या आधीन व्हायचे .. परत कधीही न उठण्यासाठी . आपले मृत्युपत्र करून त्याने आपल्या कपाटात सहज सापडेल असे ठेवले होते.

हे असे काही तो करेल हे त्याचे त्याला सुद्धा खरे वाटत नव्हते. चांगली मध्ये नोकरी होती. स्वताः चा बेडरूम चा फ्लॅट होता ,गाडी होती ..खूप पैसे मिळत होते पण एकाएकी त्याची कंपनी बंद पडली . त्याची नोकरी गेली. गेले सहा महिने तो नोकरी हुडकत होता. पण सगळी कडे नन्नाचा पाढा.त्याचे सगळे सेविन्नस संपत आले होते. पुढच्या महिन्याचा या फ्लॅट चा त्याला भरता येणार नव्हता. आई वडिलांनी येव्हडे कष्ट करून शिकवले पण हा असा बेकार ..काय म्हणतील ते ?

जग काय म्हणेल ? ...या फ्लॅटचा हप्ता ..गाडीचा हप्ता तो कसा काय भरणार होता ? विचार करून त्याचे डोके फुटायची वेळ आली होती. शेवटी खूप विचार करून त्याने हा मार्ग निवडला. आत्महत्या. हा एकच मार्ग आता त्याच्या पुढे होता. तो भेकड नव्हता . असहाय होता. पूर्ण विचारांती हा निर्णय होता. त्याला त्याच्या आवडत्या मालिकेतील एक वाक्य आठवले त्याही अवस्थेत त्याच्या चेहऱ्यावर एक हलकेसे स्मितहास्य आले.

सगळी तयारी झाली होती. त्याने घड्याळात पाहिले. संध्याकाळचे वाजत होते. त्याने झोपेच्या गोळ्यांचे झाकण उघडले.भरपूर गोळ्या आहेत कि नाहीत याची खात्री करून घेतली. आता त्याला फक्त तास काढायचे होते. दिवाणखान्यात जाऊन दूरदर्शन वर कुठली तरी सिरिअल पहावी असा विचार करून तो उठला . तेव्हड्यात त्याच्या दाराची बेल कुणीतरी वाजवली.

आता या अवेळी कोण आले ? .. असे म्हणत तो दरवाजा न उघडता तसाच उभा राहिला. कोण असेल ते बेल वाजवून जाईल असे त्याला वाटले. तो बेकार झाल्यापासून त्याच्या मित्र म्हणवणाऱ्या सगळ्यांनी त्याच्या कडे यायचे बंद केले होते. याचे रोजचे रडगाणे काय ऐकत बसायचे ? आणि पार्ट्या करायला स्वरूप कडे पैसे कुठे होते?

पण परत एकदा बेल वाजली . स्वरूप आता दिवाणखान्यात जाऊन उभा राहिला.

दिवा बंद करावा का ? म्हणजे जे असतील ते निघून जातील . पण बाहेर जो कोणी असेल त्याने दिवा पाहिला असणार . तो पायांचा आवाज न करता दारापाशी गेला आणि मधून बाहेर पाहिले. बाहेर एक कोणी तरी अनोळखी मुलगा उभा होता. त्याच्या हातात एक वही होती आणि गळ्यात एक पिशवी होती. थोडेफार बोलून याला लवकरात लवकर कटवले पाहिजे असे विचार करून दार न उघडताच स्वरूप म्हणाला ,

कोण आहे ? मला आत्ता काहीही विकत घ्यायचे नाही ..

काका ..मी अरुण रामचंद्र जुन्नरकर. पलीकडे असलेल्या विद्यामंदिर शाळेचा विद्यार्थी आहे. दिवाळीच्या सुट्टीचा अभ्यास म्हणून आमच्या रेगे सरांनी आम्हाला काही



वस्तू विकायला सांगितल्या आहेत. काही पुस्तके आहेत ..उदबत्या आहेत ..मेणबत्या आहेत ..फेस पावडर आहे ...तुम्ही फक्त बघा...माझ्याकडे माझे ओळख पत्र पण आहे ..मी फार वेळ घेणार नाही तुमचा तो मुलगा अगदी गडबडीने बोलत होता ..बहुदा अनेक ठिकाणी असा संवाद त्याने केला असावा. दरवाजा न उघडण्याचा अनुभव त्याला बऱ्याच ठिकाणी आला असावा.

गेल्या सहा महिन्यात नोकरीच्या शोधात अनेक ठिकाणी नकार मिळल्याने नकार घेतल्यावर काय वेदना होतात याची त्याला कल्पना होती. स्वरूपला या मुलाबद्दल जरा आत्मीयता वाटली. त्याने जरा नाखुषीनेच दरवाजा उघडला . तो मुलगा बाहेरच उभा होता. तपकिरी रंगाची फुल पॅन्ट आणि नीट खोचलेला पांढरा शर्ट. त्यावर त्याच्या शाळेचा लोगो सुद्धा होता. आपल्या गळ्यात अडकवलेले ओळखपत्र स्वरूप कडे करत तो मुलगा मोठ्या अदबीने म्हणाला ,

धन्यवाद काका ,दरवाजा उघडल्याबद्दल ..हे माझे ओळख पत्र. असे दे ..ये आत .. तो मुलगा आपल्या चपला बाहेरच काढून आत आला. तो बराच दमलेला दिसत होता. काय रे ..पळत आलास कि काय ? नाही काका ..तुमची लिफ्ट बंद आहे ..त्या मुळे जिना चढून आलो. अरे बाप रे ! तू पाच जिने चढून आलास ? थांब तुला पाणी देतो .. स्वरूप ने त्याला पाणी दिले. त्याच्या आईची शिकवण. घरी कोणीही आले तरी पहिल्यांदा त्याला पाणी द्यायचे. आईच्या ,वडिलांच्या आठवणीने त्याला एकदम गलबलून आले. हे बघ अरुण मी जरा गडबडीत आहे ..आणि मी तुला सांगितले तसे मला आत्ता तरी काहीही विकत घ्यायचे नाही .. स्वरूप गडबडीने म्हणाला . या मुलाला लवकरात लवकर जायला सांगायला पाहिजे. हो काका ..मला तुम्ही ते मघाशीच सांगितले आहे. पण आमच्या रेगे सरांनी सांगितले आहे कि वस्तू विकल्या नाहीत तरी चालतील पण त्या फक्त दाखवून आलास तरी चालेल मग मला माझ्या वहीत तुमचे नाव आणि पत्ता नोंद करता येईल . बर दाखव ..पण पटकन दाखव ..मला काम आहे ..

अरुणने मग आपल्या पिशवीतून काही पुस्तके ,उदबत्या , मेणबत्या ..पावडर अश्या चार पाच वस्तू काढून दाखवल्या. त्या दाखवताना तो त्या कश्या चांगल्या दर्जाच्या आहेत आणि सगळ्यांना त्या कश्या आवडतात ..असे वर्णन सुद्धा तो करत होता. स्वरूप ला त्याची ही योग्य शब्दात सांगायची पद्धत आवडली. स्वरूप स्वतः अनेक ठिकाणी करत असल्याने कमी शब्दात आपल्याला काय सांगायचे आहे हे सांगणे किती महत्वाचे आहे याची त्याला कल्पना होती.

हे असे दारोदार वस्तू विकायचे तुला कुणी आणि कश्यासाठी सांगितले ?सगळ्याच मुलांना सांगितले आहे का ? .. स्वरुपने थोड्याश्या कुतूहलाने विचारले .

आमच्या शाळेच्या रेगे सरांनी . ते आमच्या शाळेचे मुख्याध्यापक आहेत. दिवाळीच्या सुट्टीत अशी बरीच कामे त्यांनी आम्हा मुलांना सांगितली आहेत ..

काय काय कामे सांगितली आहेत .?

ह्या वस्तू विकायच्या. त्याचा योग्य हिशोब ठेवायचा ..तीन किवा चार वेळा बँकेत जाऊन वडिलांचे पैसे भरायचे ..चेक भरायचा ..बाजारात जाऊन भाजी विकत आणायची ..एखाद्या दुकानात जाऊन घरी नेहमी लागतात त्या वस्तू विकत आणायच्या ..

अरे वा ! फारच छान ..म्हणजे तुम्हा मुलांना बाहेरच्या जगाची ओळख होते. समाजात कसे वागावे हे समजते ..फार सुंदर कल्पना आहे ही..

स्वरूपला त्याही अवस्थेत ही कल्पना आवडली. भेटायला हवे या रेगे सरांना एकदा. मग एकदम त्याला लक्षात आले कि आता केव्हा भेटणार तो रेगे सरांना ? अश्या किती तरी गोष्टी करायच्या राहून जाणार ..

असू दे आता. ठेऊन दे या सगळ्या वस्तू .

हो काका ..तुम्ही काही तरी घेतले असते तर बरे झाले असते. या मेणबत्या तरी घ्या. इथले दिवे सारखे जातात ..तुम्हाला उपयोगी येतील ..

अरे अरुण ..मी नको म्हणालो ना ? मग नकोत .आणि तसा माझ्याकडे इन्व्हर्टर आहे. स्वरूप जरा तिसडेपणे म्हणाला.जात का नाही हा मुलगा ?

अरुण ने त्या सगळ्या वस्तू नीट उचलून आपल्या पिशवीत ठेवायला सुरुवात केली . स्वरूप ला एकदम शरमल्या सारखे झाले. पण या वस्तू घेऊन आता काय करणार होता तो ?

काय रे अरुण ..माझ्यासारखे वस्तू न घेणारे तुला भेटत असतीलच ना ? मग तुला वाईट वाटत नाही ? आमचा राग येत नाही ?

काका ..मी जेव्हा पहिल्यांदा या वस्तू विकायला सुरवात केली ..तेव्हा अगदी पाहिल्याच दिवशी भरपूर वस्तू विकायच्या असा निश्चय करून मी बाहेर पडलो ..तेव्हा एका सोसायटीच्या रखवालदाराने मला आतच येऊ दिले नाही. वस्तू विकायचे तर दूरच. मग मी तसाच घरी गेलो ..किती तरी वेळ रडतच होतो मी. मग आईने माझी समजूत काढली आणि मला परत त्याच सोसायटीत जाऊन पुन्हा दुसरे दिवशी प्रयतक करायला सांगितले.

मग काय झाले ..किती वस्तू विकल्यास ?

काही ही नाही ..पण मी सोसायटीच्या सेक्रेटरी ना भेटून त्यांची परवानगी मिळवली. आणि सदनिकेपर्यंत पोचू शकलो .

त्या लोकांनी काहीच घेतले नाही ?

दोघांनी आम्हाला काहीही नको असे दरवाजा न उघडताच सांगितले आणि एका आजोबांनी दरवाजा उघडला पण माझे सगळे ऐकून न घेताच मला काहीही नको असे म्हणून दरवाजा धाडकन बंद केला ते खूप वैतागलेले होते .. ..त्यात एक महत्वाची स्टेप असते. ती जमली कि मग ते गणित लगेच सोडवता येते. अगदी तसेच . तुमचा घरात शिरकाव झाल्याशिवाय तुम्ही काहीही विकू शकत नाही. अगदी बरोबर समजले आहे तुला. ..काका तुमच्या कडे पुस्तके बरीच आहेत .. रणजीत देसाई चे स्वामी तुम्ही वाचले आहे का ? माझ्याकडे आहे ते . तुम्हाला देऊ का ते ? तुम्हाला नक्की आवडेल .. अरुणने आपली चिकाटी सोडली नाही. अरे रे ..मग तू काय केलेस ?

त्या दिवशी सुद्धा मी खूप रडलो .. माझ्या तोंडावर हे लोक दरवाजा कसा काय बंद करतात? मी काही भिकारी होतो का ? भिकारी लोकांशी सुद्धा असे वागू नये. मला तो अपमान सहन झाला नाही मग मी आमच्या रेगे सरांना भेटलो. अगदी रडतच त्याना माझा अपमान सांगितला . मी एव्हडा वर्गात पहिला येणारा मुलगा ...माझ्याशी लोकानी असे वागावे ?

मग तुझे हे रेगे सर काय म्हणाले ? स्वरुपने उत्सुकतेने विचारले. ते माझ्या जवळ आले आणि माझ्या पाठीवरून हात फिरवत म्हणाले .. एक गोष्ट नेहमी लक्षात ठेव . ते तुला हाकलून घालत नाहीत ..तू विकणाऱ्या वस्तूंना हाकलत असतात. त्यांना तू नको असतोस असे नाही ..त्यांना तू विकणाऱ्या वस्तू त्या वेळी नको असतात. तू चुकीच्या वस्तू चुकीच्या माणसाना तरी विकत असतोस किवा त्या चुकीच्या वेळी तरी विकत असतोस. तुला वाईट वाटायचे काहीच कारण नाही ..अपमान झालाच असेल तर त्या वस्तूंचा ..तुझा नाही आणि हे बघ . विक्री कारणे ही एक कला आहे. ती कष्टपूर्वक आत्मसात करावी लागते. तेव्हा ही कला शिकताना तू किती वस्तू विकल्यास हे महत्वाचे आहेच पण तू जिथे त्या विकू शकला नाहीस तिथे तू का विकू शकला नाहीस? हे समजून घेणे तितकेच महत्वाचे आहे.

स्वरूप एकदम अंतर्मुख झाला. म्हणजे त्याला नोकरी साठी अनेक ठिकाणाहून नकार आला तो त्याला नव्हताच . त्याच्या कडे जे कौशल्य आणि अनुभव होता तो त्या कंपन्यांना आत्ता या वेळी नको होता . इतकाच त्याचा अर्थ. माझा अपमान झाला ..मला ते कसे काय नकार देऊ शकतात? असे समजून त्याने जो आपला इगो दुखावून घेतला होता तो एक तद्दन बावळटपणा होता .आपण या सर्व अनुभवातून काय शिकलो ? याचा त्याने विचारच केला नव्हता. त्याचे बाबा नेहमी सांगत असत . पराजय हा खूप मोठा गुरु आहे. त्याला एकदम लक्षात आले. उपदेश लक्षात ठेवणे सोपे असते पण ..योग्य वेळ येताच तो अमलात आणणे फार अवघड असते. **(पान ६ वर)**

# मुकी होत चाललेली घरं

सर्वात मुख्य संवाद हीनता वाढल्याने घरं मुकी होत चालली आहेत.कुटुंब लहान झालं, संबंध कमी झाले.सणवार घरात एकत्र साजरे करण्यापेक्षा बाहेर जाऊन मित्रांसोबत पार्ट्या करणे किंवा बाहेरुन जेवण मागवून औपचारिक रित्या सण साजरे केले जातात.त्यामुळे घरात सर्वांनी मिळून स्वयंपाक करणे किंवा त्यावर चर्चा होत पंगती बसवणं हे सर्वच कमी झाले आहे. शिष्टाचार कमी झाला लाज-लज्जा कमी झाली .घरात खाणे कमी झाले ,पुस्तक वाचन कमी झालं. त्यावर चर्चा करणं कमी झालं. बहिण भावातील प्रेम कमी झालं.आनंद घटला आणि मन:शांती कमी झाली पाहुणे कमी झाले

सत्य कमी झालं सभ्यता कमी झाली

मनोमिलन कमी झालं .एकमेकाप्रती समर्पण कमी झालं.मोठ्या माणसांबद्दलचा सन्मान कमी झाला .सहनशक्ती कमी झाली धैर्य कमी झालं. श्रद्धा-विश्वास कमी झाला.मदतीचा हात आखडता घेतला जातो.

ज्यामुळे जीवन सोपं होतं सरळ होईल अशा आणखी बऱ्याचशा गोष्टी कमी झाल्यात.

पण त्यासाठी काय कारणं आहेत हे जाणून घेतलं पाहिजे. संवाद हीनता पण वाढली आहे . विभक्त कुटुंब झाल्याने घरावर संस्कार करणारे वयस्कर व्यक्ती कमी झाल्या आहेत तरी आईवडिल आपल्या मुलांना सणावाराला नातीगोती जपणारे असतील तर संस्कार होतील.परंतु घरातील स्त्री नोकरीनिमित्ताने घराबाहेर पडली आणि काही प्रमाणात घरात दुर्लक्ष होऊ लागले परंतु नोकरी करणेही गरजेचं आहे. त्यामुळे सणावाराला तसेच रोज रात्री जेवण करताना मुलांची एकत्र बसून विचारपूस करणं आणि चार गोष्टी हिताच्या समजावणं हे

जरी केलं तरी खूप काही साधेल असं मला वाटतं.व्यवहारात इंग्रजी भाषेची गरज असली तरी आपले संस्कार देणं ही गरजेचं आहे .हे काम घरातील मोठ्यांचे आहे.पण त्यांनीच सर्व सोडतं घेतलं तर काम कठिणच आहे.

घरात वयस्कर व्यक्तींची उणीव--



सौ ऐश्वर्या डगांवकर. पुणे
मो.९३२९७३६६७५

पूर्वी घरांत उंबरठे आणि मोठी माणसं असायची. त्यामुळे घराचा कारभार मर्यादेत आणि धाकात चालायचा. कुठल्याही कार्याचा श्रीगणेशा करण्याआधी घरातील जेष्ठ मंडळीचा सल्ला घेतला जायचा. त्यांच्या अनुभवाचे सर्व विचार करायचे. त्यामुळे घरातील देवघरा नंतर महत्वाचे स्थान म्हणजे घरातील वयस्करांचे होते.आताची वास्तविकता पार वेगळी आहे. काळानुसार घरात गुळगुळीत फरश्या बसल्या आणि घरातील सदस्य घराच्या मर्यादा आपआपल्या सोयीने ठरवू लागले. स्वयंपाकघर काय अन् देवघर काय.. सगळीकडे घरभर चपला घालून फिरायला सुरुवात झाली.

मोठी माणसं नाहीशी होत आहेत त्यामुळे धाक नावाची गोष्ट सुद्धा लोप पावत चालली आहे. मर्यादा, धाक , शिस्त , संस्कृती इत्यादि प्रकारच्या या गोष्टी हल्ली व्हॉट्स ॲप वर सकाळी सकाळी वाचण्यापुरत्या राहिल्या आहेत.पूर्वी ह्याच गोष्टी, चालीरीती घरातील मोठी माणसे सांगायची. म्हणून घरात मोठी वयस्कर माणसे पाहिजेत. संध्याकाळी दिवे लावणीला शुभंकरोति - रामरक्षा-आरतीचे स्वर कानावर पडायलाच पाहीजेत. रात्री घरी उशिरा आल्यानंतर काळजीपोटी प्रश्नोत्तरे झालीच पाहिजेत...!

रात्रीचं उरलेलं अन्न टाकून देण्याऐवजी त्याला फोडणी -तडका देऊन आणखी चविष्ट व चटपटीत बनवून सकाळच्या न्याहरीत वाढणारं कुणीतरी पाहिजे.मोजून-मापून खर्च कसा करायचा याचे धडे शिकवणारं,चुकलं तिथे रागवायला व कधीतरी तोंड भरून कौतुक करायला घरात कुणी हवं असतं.

एकाच छताखाली सर्वांना एकत्र पद्धतीत बांधून ठेवणारं, टिव्ही बंद ठेवून सर्वांनी सोबत जेवण कां करावं यामागचं कारण उत्तमरित्या पटवून देणारं, घराबाहेर पडतांना देवापुढचा अंगारा कपाळावर लावणारं, आनंदाच्या वेळी पटकन देवापुढे साखर ठेवणारं, तर संकटाच्या वेळी आपल्यासाठी देवाला पाण्यात ठेवून माळ जपत प्रार्थना करणारं घरात कुणीतरी मोठं असलं तर संवादहीनता कमी होईल.

पिकलेले पांढरे केस असू देत की अंधुक झालेली नजर असली तरी त्या नजरेतील माया कमी होत नसते. आशीर्वाद देताना थरथरणारे हाथ असले तरी पाठीवर कौतुकाची थाप पडली की दुप्पट उत्साहाने ध्येय गाठायला मन सरसावतं. सुरकुत्या पडलेलं शरीर कष्टाने झिजलेलं आणि अनुभव संपन्न असतं लिंबू-मिरचीला मानणारे विचार असले तरी त्यामागची काळजी आपल्याला पुढे पाऊल टाकू देत नाही हे मात्र खरं.एक गोष्ट चार-चार वेळा सांगणारं ,बडबडणा-या तोंडाचा कंटाळा करताना बालपणी आपणही त्यांना असंच बडबड करून सतावलं असणार हे समजून घ्या. कमी ऐकू येणारे कान.. कसं कां असेना पण सांगणारं सावरणारं कुणी हवं. ज्या झाडाला फळं-फुलं येत नाही त्या झाडाला आपण बिनकामी झाड म्हणतो. परंतु ते झाड़ फळ-फुलं जरी देत नसलं तरी निदान सावली तरी देतं.. त्या सावलीसारखीच घरातील मोठी-वयस्कर माणसं असतात...!

त्यांच्या असण्यानेच आपल्याला नकळत खूप आधार होतो. त्यांचे अस्तित्व आपल्यासाठी खुप मोलाचे असते. घरातून बाहेर पडतांना डोकं ठेवून नमस्कार करण्यासाठी घरात ते अनुभवी पाय असायलाच हवे असं वाटतं!



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

आनंदी वाटचाल

# अहंकार आणि ममत्व

मनुष्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार प्रत्येक मनुष्य आपले कर्म स्वतःच्या सुखाकरिता करीत असतो. त्याचे लक्ष नेहमीच स्वतःच्या सुखप्राप्तीकडे असते .स्वतःला शुल्लक इजा झाल्याने तो जितका दुःखी होतो तितका इतरांचे भयंकर हाल पाहुनही होत नाही. इतरांपेक्षा स्वतःविषयी मनुष्याला जे विशेष प्रेम वाटते त्याला ममत्व भावना असे म्हणतात. स्वतः विषयी, स्वतःच्या गोष्टीविषयी आणि स्वतः च्या निकटच्या नातलगा विषयी ममत्व भावना निसर्गतः उत्पन्न होते.

मनुष्याच्या जीवनात अत्यंत आवश्यक असणाऱ्या भावनांपैकी ममत्व भावना ही एक आहे. व्यक्ती आणि समाज यांचे जीवन फार कष्टाचे आणि दुसह्य होईल .ममत्व भावनेमुळेच मनुष्य स्वतःच्या हिताला जपतो. कुटुंब समाज आणि राष्ट्र यांना सुसंघटित ठेवण्याकरिता ममत्व भावना आवश्यक असते. ज्या मानाने कुटुंब समाज आणि राष्ट्र यांच्या घटकात परस्परांविषयी ममत्त्व भावना तीव्र असेल त्या मनाने त्यांचे सामर्थ्य वाढते व सर्व घटक सुखी होतात. पण इच्छे प्रमाणे ममत्त्व भावना ही विकृत किंवा अमर्याद होऊ शकते आणि ती तशी झाली म्हणजे मात्र ते हितकर होण्याऐवजी अपायकारक होते. मग तिचे शुद्ध स्वरूप नाहीसे होऊन तिला निरनिराळी अनिष्ट रूपे प्राप्त होतात, आणि त्यानुसार तिचे कार्यही बदलते.

ममत्व भावनेचा अतिरेक झाला म्हणजे मनुष्य स्वतः आणि स्वतःचे म्हणून जे काही तो समजतो तेवढ्या विषयीच तो नेहमी विचार करतो त्यांच्या सुखाकरिता झटतो इतरांच्या सुखाची होळी करून तिच्यावर स्वतःची पोळी शेकू पाहतो. भारतात आणि विशेषतः हिंदू समाजात व्यक्तीविषयक ममत्व भावना अतिरेकांस गेलेली आहे स्वतः करिता स्वर्ग मोक्ष ईश्वर प्राप्ती ही ध्येये हिंदू समाजातील लोकांपुढे शतकानुशतके ठेवली गेल्यामुळे इतरां करीता मनुष्याचे काही कर्तव्य असते ही गोष्ट सहसा कुणाच्या ध्यानातही येत नाही. त्यामुळे हिंदू समाजात फुटीर वृत्ती अमर्याद पोसली गेली असून संघटना आणि त्याचबरोबर ब्रह्म ही साहजिकच कमी झाले व परकीयांना हिंदू समाजावर आक्रमण करणे फार सोपे झाले .असली ममत्व भावना अत्यंत अनिष्ट होय.

व्यक्तिगत ममत्व भावनेचा अतिरेक समाज हिताला बाधक होतो एवढेच नव्हे तर पर्यायने व्यक्तीच्या गुणाला ही तो मारक होतो. स्वतःच्या इच्छा तृप्त झाल्या पाहिजे मग इतरांचे काहीही होवो. असली स्वार्थी वृत्ती व ममत्त्व दुसऱ्यांच्या मानापमानाचा किंवा हिता हिताचा आपण विचार केला नाही म्हणजे दुसरेही आपल्याशी तसेच वागतात त्यामुळे दुसऱ्यापासून आपल्याला साहजिकच त्रास होतो. स्वतःच्या इच्छा तृप्तीच्या आड इतर आले म्हणजे आपल्या मनाला विशाद वाढतो. स्वतःला शुल्लक दुःख झाले तरी ते असह्य वाटू लागते नेहमीच स्वतःविषयी विचार मनात चालू असले म्हणजे स्वतःची व इतरांची निरनिराळ्या बाबतीत मनात तुलना चालू असते त्यात आपले सुख इतरांच्या मानाने कमी वाटते आणि इतर जास्त सुखी दिसतात पण दुःख मात्र आपले जास्त आणि इतरांचे कमी वाटते. त्यामुळे स्वतःचे मन जास्त दुः खकष्टी होते. मनाला स्वस्थता आणि आराम कधीच वाटत नाही. त्यामुळे हातून कोणतेच काम धड होत नाही व काम नीट न झाल्याने पुन्हा विशाद दुख अस्वस्थता इत्यादी अनिष्ट विकार वाढतात त्यामुळे आमर्याद ममत्वामुळे अनेक विपरित आणि अनिष्ट परिणाम व्यक्तीला भोगावे लागतात, आणि व्यक्तीचे जीवन दुखी आणि अयशस्वी होते. व्यक्तीप्रमाणे निरनिराळे वर्ग समाज राष्ट्र आणि देश यांच्यामधील मंमत्व भावना अतिरेकास गेल्यामुळे सामाजिक भांडणे वर्ग कलह आणि देशामध्ये युद्ध होतात. आणि अशांतता माजून सर्वांनाच दुःख भोगावे लागते. स्वार्थी पणा हा सुद्धा ममत्व भावनेचा एक अनिष्ट प्रकार आहे मनुष्य जितका जास्त स्वार्थी असेल तीतकी त्याच्या स्वार्थाची वस्तुतः हानी होते आणि स्वार्थीपणा हा अखेर स्वतःच्या



सुखाला मारक होतो असा अनुभव येतो .

यासाठी उपाय म्हणजे स्वार्थत्याग स्वार्थबुद्धी सोडून परार्थ बुद्धीने केलेली सर्व कर्मे हे एक प्रकारचे यज्ञहोय. सर्व सृष्टी परस्परांनी परस्परांकरिता केलेल्या त्यागावर चाललेली आहे. कनिष्ठानी श्रेष्ठां करिता त्याग करावा आणि श्रेष्ठानी कनिष्ठां करता त्याग करावा याप्रमाणे परस्परांनी परस्परांकरीता त्याग करीत गेल्यानेच सर्वांची उन्नती होते आणि सर्व सुखी होतात. प्रत्येकात स्वार्थ त्यागी वृत्ती ज्या प्रमाणात असेल त्या मानाने सर्वांना सुख लाभते.

स्वार्थत्याग कोणत्या रीतीने करायचा हा प्रश्न गौण आहे. मनातील ममत्व भावना कमी करून इतरांकरिता शक्यतो त्याग करण्याची भावना नेहमी मनात असली पाहिजे हाच महत्वाचा मुद्दा आहे .स्वार्थ त्यागाची भावना मनात असली म्हणजे इतरां करिता काय करता येईल ते स्वतःची शारीरिक मानसिक आणि बौद्धिक आणि अनेक शक्ती व इतर परिस्थिती पाहून कोणालाही ठरविता येईल मनुष्यांना स्वतःविषयी योग्य प्रमाणात ममत्त्व वाटले पाहिजे. तसेच स्वतःबद्दल योग्य आदर किंवा आत्म सन्मानाची भावना ही मनुष्याच्या मनात असली पाहिजे .ज्या मनुष्यात आत्मसन्मानाची भावना नसते त्याचे मन शुद्र कामात गुंतून राहते. आत्मसन्मान भावना युक्त मनुष्येच अलोट स्वार्थत्याग करण्यास तयार होतात. पण स्वतः विषयी वाजवी पेक्षा जास्त आदर वाटू लागला की त्या सन्मान भावनेला अहंकाराचे अनिष्ट रूप येते. अभिमान अहंकार गर्व दर्प मद हे ममत्त्व भावनेचे एकापेक्षा एक जास्त अनिष्ट आणि नीच प्रकार आहे. तसेच प्रेम दया परोपकारीपणा स्वार्थ त्यागी वृत्ती आत्मौपम्य हे ममत्व भावनेचे उदात्त आणि उच्च प्रकार आहेत. ममत्व अहंकार या भावनांमुळे मनात फलासक्ती निर्माण होते ती मनुष्याच्या दुःखाला कारणीभूत होऊन यशाच्या मार्गात अडचणी उत्पन्न करते ममत्व आणि अहंकार या भावना मर्यादेत ठेवण्याचा एक परिणामकारक उपाय असा की मी ची व्याप्ती स्वतःभोवती संकुचित न ठेवता मी व्यापक करावा सरळ भूतांच्या ठिकाणी आपण आहोत आणि आपल्या ठिकाणी सर्वभूत मात्र आहे इतक्यामर्यादे पर्यंत मी चि व.याप्ती वाढवणे हे अंतिम ध्येय आहे. असे झाले की ममत्व आणि अहंकार भावना कमी अपायकारक आणि जास्त हितावह ठरू शकते.



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

उमलत्या कळ्या

# आवड

समीर आपल्या वडिलांजवळ बसला आणि म्हणाला, पप्पा, संकुलला आपण व्हिडीओ शुटींगचं साहित्य घेऊन दिलं तर.... समीरच्या प्रश्नाने त्याच्या वडिलांच्या चेहऱ्यावर रागाच्या रेषा उमटल्या. ते काही बोलायच्या अगोदरच समीरने पुन्हा बोलायला सुरुवात केली.

पप्पा, संकुलला क्रिकेटची आवड आहे, हे आपण सर्वांनीच मान्य करायला हवं. त्याने छंद आणि शिक्षण यात छंदाला अधिक वेळ दिला. त्यामुळे तो हुशार असूनही वैद्यकीय पात्रता परीक्षेत मागे पडला. पण याच गोष्टीवर त्याला आपण किती ताणणार? त्याच्या छंदाला व्यवसायाची जोड दिली तर तो त्यात रमेल तरी.

तुम्ही भावंड त्याला अजुन क्रिकेटमध्येच गुंतवा! मला कंटाळा आला या परिस्थितीचा. समीरचे वडील त्रागा करत म्हणाले.

अहो! तो काय सांगतो, ते तर ऐका. पटलं तर हो म्हणा. नाहीतर नाही सांगा. समीरची मम्मी समजुतीचं बोलली.

संकुल आता शिक्षणाच्या प्रवाहात पुन्हा येणं शक्यच नाही. त्याच्यावर असा राग काढत राहिलो तर तो आपल्यापासून दूर जाईल.

नाहीतर तो घरात कधी असतो. सारखा क्रिकेट खेळायला बाहेरच गेलेला असतो.

ऐका. माझ्या डोक्यात एक कल्पना आलेय. हल्ली गावोगावी क्रिकेटचे सामने आयोजित केले जातात. मात्र त्यातही तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. हे गल्ली-बोळातले क्रिकेट सामने समाज माध्यमांवरून प्रसारित केले जातात. आपल्या संकुलला आपण दोन-तीन कॅमेरे आणि इतर साहित्य घेऊन दिलं तर तो क्रिकेट सामन्यांच्या प्रसारणाचा व्यवसाय करू शकेल. मी बोललोय त्याच्याशी या संदर्भात.

या गप्पा चालू असताना संकुलचा मोठा भाऊही तिथे आला.

त्याला लागणारं भांडवल आम्ही पुरवू. तुम्ही काळजी नका करू.संजयचं बोलणं ऐकून वडिलांचे मतपरिवर्तन झाले.

हे बघा, शेवटी त्याचं आयुष्य त्यालाच जगायचंय. तुम्ही भांडवल उभारून द्याल नि त्यानं त्याकडे दुर्लक्ष करावं असं होता कामा नये.

पप्पा, क्रिकेट हा त्याच्या आवडीचा प्रांत आहे. त्यामुळे त्यात तो वाट्टेल तितकी मेहनत करेल, याची खात्री आहे आम्हाला. संजय म्हणाला.

पोरांनो ! संकुलला मार्गी लावा रं लेकरांनो! आजी कापऱ्या स्वरात बोलली.

खरंतर संकुल सर्वांचा लाडका होता. अभ्यासात हुशारही होता. मात्र पुढे क्रिकेटच्या खेळात तो इतका गुंतला की त्याचं अभ्यासातील लक्ष कमी झालं नि क्रिकेट खेळण्यामध्ये तो अधिक वेळ देऊ लागला. अभ्यासातील हुशारीइतकाच क्रिकेट खेळण्यातही संकुल तरबेज आहे. एखाद्या संघात त्याचा सामावेश असणे म्हणजे संघ जिंकण्याची खात्रीच समजा. फलंदाजी तर अफलातून करतो. सोबत तो भरवशाचा गोलंदाजही आहे. संपूर्ण सामना फिरवण्याची ताकद त्याच्या खेळण्यात आहे. मैदानात उतरला की तो खेळातला अभिन्न अंग बनतो. खेळातली बदललेली भूमिका निभावताना असा वाटतो की सगळा खेळ त्याच्याच अंगात उतरला आहे. तो अत्यंत नैसर्गिकरीत्या खेळतो. त्याच्या खेळण्यातील सहजता हीच फार सुंदर गोष्ट आहे. खेळतांना तो इतका आनंदी असतो की त्याचा आनंद खेळण्यातून व्यक्त होतो. त्याच्या या सहज आणि समरसून खेळण्यामुळे संघाला तर फायदा होतोच, शिवाय पंचक्रोशीत त्याचा नावलौकिक झाला आहे. अनेकजण त्याला आपल्या संघात खेळण्यासाठी पाचारण करतात. मग तो ही नाही म्हणत नाही. मैदानात नसेल तेव्हा कॉमेंट्री बॉक्समध्ये त्याची हुशारी ऐकायला मिळते. चपखळ शब्दांची पेरणी करत तो सामन्याचं उत्कृष्ट धावतं वर्णन करतो. सामना पाहणाऱ्यांना क्षणभर आंतरराष्ट्रीय सामन्याचा भास व्हावा, असं वातावरण तो आपल्या शब्दांनी तयार करतो.

पंचक्रोशीतील लोक संकुलचं, त्याच्या खेळण्याचं खूप कौतुक करतात. मात्र पालकांना त्याच्या भविष्याविषयी चिंता वाटते. आईवडील म्हणतात, नुसतं खेळून आपल्यासारख्यांचं पोट भरणार आहे का? काहीतरी नोकरीधंदा करायला पाहिजे. पालक म्हणून त्यांची भूमिका पारंपारिक असली तरी त्यामागे काळजी, माया आहे.

या अशा परस्परविरोधी भूमिकेमुळे संकुलविषयी कुटुंबात कायमच प्रश्न विचारले जात होते. त्यावर त्याच्या दोन्ही थोरल्या भावंडांनी निर्णय घेतला. मोठा संजय म्हणतोय की प्रत्येकाला आपापल्या आवडीचं काम करायला मिळालं तर तो भविष्यात कदाचित चार पैसे कमी कमाई करील, मात्र जगण्यातला आनंद अधिक मिळवू शकेल.

वडिलांच्या होकारानंतर दोघा थोरल्या भावांनी संकुलला दोन कॅमेरे, ड्रोन, स्टॅन्ड इत्यादी साहित्य आणून दिले. अधिकृत चॅनलची नोंदणी केली नि समाजमाध्यमांवरून नव्या व्यवसायाची भरपूर जाहिरात केली.

दिवाळीनंतर शेतं, माळरान मोकळे झाले की क्रिकेटचा उत्साह गावोगावी सुरू होतो. यंदा तर नेमकी याच कालावधीत मध्यवर्तीनिवडणुकाही जाहीर झाल्या होत्या. त्यामुळे क्रिकेटच्या उत्साहाला उधाण येणार, हे हेरून त्यांनी शुभमुहूर्त साधला होता.

संकुलचं नाव पंचक्रोशीत माहित होतचं. खेळाडू त्याच्याकडून प्रसारणाची सेवा घेऊ लागले. प्रसारणाचं हे नवं तंत्रही संकुलने इतरांचं बघून-बघून अवगत करून घेतलं होतं. त्यातही त्याने नवीन प्रयोग करायला सुरुवात केली. इतरांपेक्षा अधिक उत्तम प्रसारणसेवा तो देऊ लागला. पहिल्या हंगामामध्ये अपेक्षेपेक्षा अधिक व्यवसाय झाला. त्यातून त्याने आणखी दोन ड्रोन कॅमेरे खरेदी केले.

छायाचित्रणासाठी तो चुलत भावंडांची मदत घेऊ लागला. वर्षभरात संकुलने मोठ्या भावंडांनी गुंतवलेल्या रक्कमेची परतफेड केली. मे महिन्यातले ऊन वाढले. तसा क्रिकेटचा हंगाम उतरणीला लागला. मग





याच कॅमेऱ्यांचा उपयोग संकुलने लग्नसमारंभात करण्यास सुरुवात केली. एक मोठा एलईडी खरेदी केला नि आणखी चार जणांना रोजगार मिळू शकेल, इतका व्यवसायाचा व्याप वाढवला.

याचदरम्यान दूरगावी राहणाऱ्या आत्याच्या मुलीचे लग्न होते. वयस्कर आजीला लग्नाला जाणे शक्य नव्हते. आजीला मात्र नातीचे लग्न बघण्याची फार इच्छा होती. तिच्या मनाची घालमेल बघून संकुल म्हणाला, आजी, तू इथं टी.व्ही. समोर बसून प्रितीचं लग्न बघू शकशील. मी तुला ऑनलाईन हळदी नि लग्न दाखवीन. आजीने आपल्या दोन्ही हाताचे पंजे संकुलच्या डोक्यावरून, गालावरून फिरवत बोटे स्वतःच्या कानशिलांवर वाजवली.

कुटुंबातले सगळेजण संकुलचे कौतुक पाहण्याऐवजी वडिलांच्या चेहऱ्यावरील भाव निरखत होते. थोरल्या दोन्ही मुलांप्रमाणे संकुलने शिक्षण पूर्ण करावे. किमान पदवीधर व्हावं. मोठ्या भावंडांप्रमाणे स्पर्धा परीक्षा देऊन नोकरी मिळवावी, असं वडिलांना खूप वाटत असे. मात्र संकुल आपल्या आवडीच्या क्षेत्रात उत्तम काम करण्यात समाधानी असल्याचे पाहून वडिलांच्या डोळ्यात आनंद आहे. तोच आनंद कुटुंबातील इतरांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

# जेष्ठांनो, सायबर सुरक्षित राहा!




१. ज्या बँकेशी आपले ऑनलाईन , पेमेंट ॲप्स जोडलेली आहेत, त्या बँक खात्यात जास्त पैसे ठेवू नका. अगदी महिना खर्चायला लागतील असेच पैसे त्या खात्यात ठेवा.

२. बाकीचे पैसे दुसऱ्या बँक खात्यात ठेवा. खूप मोठी रक्कम शिल्लकीत असेल आणि लागणार नसेल तर सरळ तुमच्या घराजवळच्या राष्ट्रीयकृत बँकेत फिक्स डिपॉसिट करून ठेवा. ते फिक्स डिपॉसिट महिन्यांपेक्षा जास्त नको.

३. दोन पेक्षा अधिक बँक खाती ठेवू नका असा माझा सल्ला. शिवाय ती दोन बँक खाती शक्यतो घराजवळ असलेल्या बँकेत असावीत. त्यातले एक खाते मोबाईल मधील पेमेंट ॲपला संलग्न करा आणि यात जरुरी पुरते पैसे ठेवत जा.

४. तुमच्या मोबाईलवर शक्यतो एकच पेमेंट ॲप ठेवा. जेवढी जास्त पेमेंट ॲप्स असतील तेवढा अटॅक सरफेस वाढतो. सोप्या भाषेत, सायबर चोरांना अधिक संधी मिळते.

५. व्हॅट्सप्प, पेमेंट ॲप्स, फेसबुक सारखी अकांऊट, जि मेल किंवा इतर ई-मेल ॲप्स आणि इतर सर्व ॲप्स याना जिथे जिथे शक्य असेल तिथे फॅक्टर ऑथेंटिकेशन सुरु करा.

६. कोणताही कोणालाही देऊ नका. जर तुम्हाला काही शंका असेल किंवा समोरचा जर साठी प्रेशर करत असेल तर आपल्या मुलांची, किंवा विश्वसनीय नातेवाईकांची मदत घ्या. लक्षात ठेवा: प्रचंड नुकसानीपेक्षा एखादे काम उशिरा झाले तर चालेल.

७. जर तुम्ही टेक नसाल आणि मोबाईल , इंटरनेट यासारख्या गोष्टी समजायला अवघड जात असतील तर माझे म्हणणे असे की फेसबुक , व्हाट्सअँप, मोबाईल पेमेंट वापरूच नका. दिवस वाईट आहेत. व्हाट्सअप , फेसबुक हॅक करणे, आणि मग त्यातून समाज माध्यमांवर आक्षेपार्ह मजकूर तुमच्या नावाने टाकणे असे प्रकार घडले आहेत. करून जाणारा करून जातो आणि निस्तरायला ज्याच्या अकाउंट मधून प्रकार झालाय त्याला लागते.

८. व्हाट्सअँप , टेलिग्राम , नेटफ्लिक्स आणि अशा अनेक ॲप्स ला एकाच अकाउंट मधून अनेक डेव्हिसेस वर लॉगिन करता येते. या ॲप्स वर तुमच्या नावाने कुठे कुठे डिवाइस वर लॉगिन आहे हे दिसते. इतकेच काय तर त्या डिव्हाईस मधून कधी लास्ट लॉगिन केलाय तेही दिसते. ते नियमित चेक करा. त्यात शंकास्पद काही आढळलयास सर्व इतर डेव्हिसेस वरील सेशन लॉगऑफ करा. पाहिजे तर यासाठी आपल्या मुलांची, नातवंडांची मदत घ्या. मी इतके पावसाळे पाहिलेत, तितके उन्हाळे पाहिलेत, तुम्हाला काय कळत ? असं नव्या पिढीला म्हणायचे दिवस संपलेत.

९. तुम्ही घरात वाय फाय वापरात असाल तर त्याचा पासवर्ड खूप किचकट ठेवा, आणि गरज वाटली तर महिन्याला बदल करा. हे वाय फाय राउटर अशा ठिकाणी ठेवा की तुमच्या घरात व्यवस्थित रेंज मिळेल पण घराबाहेर ती मिळनार नाही.

१०. तुम्ही घरात सोबतीसाठी भाडेकरू, पेइंग गेस्ट ठेवले असतील , किंवा घरातील नोकर माणसे असतील तर त्यांना तुमचे वाय फाय वापरू देऊ नका.

लक्षात घ्या, तुमच्या वाय फाय वरून ज्या काही ॲक्टिव्हिटी होतील त्यासाठी ज्याच्या नावावर ते इंटरनेट कनेक्शन आहे त्याला कायदा प्रथम जबाबदार धरेल.

११. बिट कॉइन, क्रिप्टो करन्सी यात गुंतवणूक करूच नका. लक्षात ठेवा : जास्त परताव्यासाठी जोखीम पत्करायचे तुमचे दिवस केव्हाच संपलेत. या वयात तुमचे आहेत ते पैसे तुम्हाला सांभाळून वापरायचे आहेत, जपायचे आहेत, शेवटपर्यंत पुरवायचे आहेत आणि तुम्ही निसर्ग विलीन झाल्यावर उरले तर पुढील पिढीला वारसा म्हणून द्यायचे आहेत.

१२. तुम्ही भारतात एकटे असाल, आणि मुले परदेशात असतील तर तुम्ही राहत असलेल्या शहरात किमान नातेवाईक असे हवेत की जे गरज पडल्यास तुमच्या मदतीस येतील. असे नातेवाईक शोधून ठेवायचे काम मुलांनी करावे. रेगुलर त्यांच्या संपर्कात राहावे.

१३. तुमचा मुलाला अपघात झालाय, त्याला पोलिसांनी अरेस्ट केलाय, असे धमकावणारे, घाबरवणारे फोन आले, तर प्रथम या नातेवाईकांना कळवा आणि त्यांची मदत घ्या. कोणालाही पैसे, , देऊ नका. तुमची खाजगी माहिती देताना ती व्यक्ती खरेच विश्वासार्ह आहे याची खात्री करून घ्या. अशी माहिती देताना खरंच त्या वक्तीला या माहिती असण्याची गरज आहे का याचा विचार करा. शंका आली तर माहिती देण्यास सरळ नकार द्या.

कौस्तुभ पोंक्षे
मो.८००७६०५०८२

१४. शक्यतो शेजाऱ्यांशी चांगले संबंध राखून असा. तुम्हाला सर्वात त्वरित मदत तुमच्या शेजाऱ्याकडूनच मिळू शकते.

१५. तुमचे बँक पासबुक वेळोवेळी अपडेट करून घ्या. मोबाईल ॲप्स मध्ये प्रेसेंट बॅलन्स दिसतोच पण जर नसाल वापरात तर ...

१६. मीडिया , समाजात जे काही चाललंय ते कदाचित तुम्हाला पटत नसेल पण त्यावर प्रतिक्रिया देताना सावध असा. सध्या समाजाच्या संवेदना खूप नाजूक झाल्यात. एखाद्या तुमच्या शब्दाचा अर्थाचा अनर्थ करून विघातक लोक तुम्हाला त्रास देतील. तेव्हा सावध असा.

१७. तुमच्या सर्व गुंतवणुकीवर नॉमिनी नोंद करून घ्या. नंतर वारसांना फार त्रास होतो.

१८. विल करून ठेवा.

१९. जेष्ठ नागरिकांच्या मुलांनी आपल्या पालकांना वरील सर्व कामांसाठी मदत करावी, त्यांच्या इंटरनेट बाबत ॲक्टिव्हिटी नेहमी मॉनिटर करावया. जर आपले पालक इंटरनेट आणि त्यासंबंधित बाबी समजून घेण्यासाठी असमर्थ असतील तर त्या गोष्टी त्यांना न दिलेल्याच उत्तम.

# आपण कुठे चुकलो याचा अभ्यास करा

कोण कसं वागला या विचारात स्वतःला त्रास करून घेण्यापेक्षा आपण पुढे कसं वागायचं याचा विचार करा. आपण कुठे चुकलो याचा अभ्यास करा. त्यांच्या चुका तिथेच सोडून द्या आणि पुढच्या प्रवासाला सुरूवात करा. या दुनियेत असा एकही मनुष्य नाही ज्याच्या जीवनात दुःख,अडचणी नाहीत. ज्याने सृष्टी निर्माण केली त्यालाही हे सर्व भोगावं लागलंय . आपण तर साधारण मनुष्य आहोत.सर्व गोष्टी आपल्या मनासारख्या झाल्या पाहिजेत हा आग्रहच माणसाच्या सर्व दुःखाला कारणीभूत ठरतो.

कोणाच्या वाईट वागण्याने आपलं काहीही वाईट होत नसतं. मिळतं तेच जे आपण पेरलेलं असतं. आपल्याशी कोण कसही वागेना आपण सगळ्यांशी चांगलंच वागायचं. इतकं चांगलं की विश्वासघात करणारा ही पुन्हा जवळ येण्यासाठी तळमळला पाहिजे. आयुष्याची खरी किंमत तेव्हाच कळते जेव्हा स्वतःच्या जीवनात संघर्ष करण्याची वेळ येते. आयुष्यात कितीही कठीण परिस्थिती आली तरी घाबरून जाऊ नका. फक्त एकच गोष्ट लक्षात ठेवा आपण जिवंत आहोत म्हणजे खूप काही शिल्लक आहे. जी माणसं स्वतः च्या परिस्थितीला स्वतःची ताकद बनवतात ती माणसं आयुष्यात कधीही अपयशी होत नाहीत. जगणं कोणाचंही सोपं नसतं. आपण सोडून बाकी सगळ्यांचं चांगलं आहे असं फक्त आपल्याला वाटत असतं, सर्वात सुखी माणूस तोच आहे जो आपली किंमत स्वतः ठरवतो आणि सर्वात दुःखी माणूस तोच आहे जो आपली तुलना इतरांशी करतो.

ज्या पात्रतेने तुम्ही व्यवसाय करत आहात, तीच पात्रता दुसऱ्या एखाद्या व्यक्ती कडे आहे, पण त्याला व्यवसायात यश नाही, ज्या प्रार्थनेचे उत्तर देवाने तुमच्यासाठी दिले, तीच प्रार्थना इतर लोक करत आहेत पण यश मिळाले नाही. तुम्ही रोज सुरक्षितपणे जो रस्ता वापरता, तोच



रस्ता आहे जिथे अनेकांनी आपले मौल्यवान जीव गमावले. ज्या मंदिरामध्ये देवाने तुम्हाला आशीर्वाद दिला, त्याच मंदिरामध्ये इतर लोकही पूजा करतात, तरीही त्यांचेजीवन विसंवादात आहे. तुम्ही हॉस्पिटलमध्ये वापरलेला बेड, तुम्ही बरे झालात आणि डिस्चार्ज मिळाला, त्याच बेडवर इतर अनेकांनी अखेरचा श्वास घेतला.


ज्या पावसाने तुमच्या शेतात चांगले पीक आले, त्याच पावसाने दुसऱ्याचे शेत उध्वस्त केले. कारण तुमच्याकडे जे काही आहे ती फक्त ईश्वरी कृपा आहे. तुमच्याकडे असलेल्या सर्व गोष्टींचा तो दाता आहे. म्हणुनच तुमच्याकडे असलेल्या प्रत्येक गोष्टीसाठी कृतज्ञ रहा. पश्चात्ताप भूतकाळ बदलू शकत नाही आणि काळजी भविष्याला आकार देऊ शकत नाही. म्हणूनच वर्तमानाचा आनंद घेणे हेच जीवनाचे खरे सुख आहे.

दुसऱ्यांबद्दल वाईट बोलुन त्यांचे दुर्गुण सांगून, आपला चांगुलपणा आणि कर्तृत्व कधीच सिद्ध होत नसते. वय आणि पैसा यावर कधीच गर्व करू नये. कारण ज्या गोष्टी मोजल्या जातात, त्या नक्कीच संपतात. कठीण परिस्थितीमध्ये संघर्ष केल्यानंतर एक बहुमूल्य संपत्ती विकसित होते, ज्याच नाव आहे, आत्मविश्वास. जगणं हे आईच्या स्वाभिमानासाठी असावं आणि जिंकणं वडिलांच्या कर्तव्यापोटी. समोरच्या व्यक्तीशी नेहमी चांगले वागा ती व्यक्ती चांगली आहे म्हणून नव्हे तर तुम्ही चांगले आहात म्हणून

# अनोखी पितृवंदना!

२ दिवसापूर्वी अमेरीकेतील नॉर्थ कॅरोलीना विद्यापीठाच्या विल्सन कॉलेज ऑफ टेक्सटाईल मध्ये दीक्षांत समारंभाच्या भाषणात, अचानक एक मोठी घोषणा केली गेली. समारंभाचे पाहुणे भारतीय मूळ असलेले अमेरिकन नागरिक श्री अनिल कोचर होते.

ते म्हणाले १९४६ साली माझे वडील श्री प्रकाशचंद कोचर, पंजाब मधून याच विद्यापीठात शिकायला आले होते. त्यांनी १९५० साली बॅचलर्स आणि १९५२ साली मास्टर्स पूर्ण करून या देशात आपले आणि आमचे करियर बनवले. त्यांना त्यांच्या भविष्याबद्धल काहीही माहिती नव्हती. आज मी त्यांचा मुलगा, त्यांनी मला दिलेले प्रेम आणि मार्गदर्शन याबद्धल त्यांची कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांच्या स्मरणार्थ येथे उपस्थित असलेल्या सर्व १७६ बॅचलर्स डिग्री आणि २६ मास्टर्स डिग्रीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कर्ज मी आणि माझी पतकी मेर्लीन भरणार असून या कॉलेजातून बाहेर पडताना




तुम्ही कोणतीही आर्थिक जबाबदारी पाठी न ठेवता फक्त डिग्री घेऊन जा आणि पुढील अभ्यास आणि करियर करा.

अनिल कोचर हे एक अमेरिकन व्यवसायिक असून यासाठी त्यांनी सुमारे ६ मिलीयन डॉलर्स खर्च केले. लोक केक कापून मदर्स डे, फादर्स डे साजरा करतात, अनिलने अशी केली पितृवंदना.

- माधव भोळे, मो.९८१९४७९७९१



प्रा.डॉ.संजय ढोडरे
मो.९८२२५३३६४२

माझा खान्देश

# खानदेशातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा समाजपरिवर्तनाचा लढा व हिंदू-मुस्लिम संबंध


खानदेशातील समाजसुधारकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक आंदोलनांना नेहमीच भक्कम अशी साथ दिलेली दिसून येते. खानदेशात विविध आंदोलनाच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज प्रबोधनाचे विचार रुजविण्याचा प्रयतक केलेले दिसून येतो.

**अस्पृश्यता निवारण-** अस्पृश्यता ही परंपरेने खानदेशातील समाजजीवनातील मोठी व्याधी होती. अस्पृश्यता ही एक आवश्यक अशी व्यवस्था आहे. अशी समजूत खानदेशात रुजविण्यात आली. महार, मांग, चांभार, ढोर आणि तत्सम जातींना खानदेशातील सवर्ण जातींनी सार्वजनिक आणि व्यक्तिगत जीवनातील न्याय, प्रतिष्ठा व समतेपासून पिढ्यानपिढ्या वंचित ठेवले. मानवतेची वागणूक दिली नाही. अस्पृश्यांना जी हीनतेची वागणूक दिली, त्यासंबंधी असंख्य उदाहरणे दिसतात. आवश्यक ती सेवा घेऊनही रोटी-बेटी व्यवहार नाकारणे, सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यास नकार, मंदिरे, खाजगी वसतिस्थाने, येथे अस्पृश्यास मनाई, सवर्णांच्या प्रमुख रस्त्यावरून रहदारीस मज्जाव आणि गावकीची सर्व कामे करून घेऊन प्रसंगी उष्टे, उरलेसुरले अस्पृश्यांच्या पदरात घालणे म्हणजे सेवेच्या मोबदल्यात अल्पसे टाकणे, या सर्व गोष्टी लक्षात घेता, सवर्णांची ही वागणूक अमानवी होती असे दिसते.सवर्णांच्या या हीन वागणुकीचे खानदेशातील अस्पृश्य बांधवांनी ठिकठिकाणी, निषेध केलेला होता. मबहिष्कृतांच्या खानदेश परिषदाफ आयोजित करून अन्याय विरुद्ध गुलामी विरुद्ध जागृत होण्याचे आवाहन वेळोवेळी करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाच्या उदयापूर्वी काही सुधारणावादी कार्यकर्ते आणि सेवक अस्पृश्यता निवारणासाठी प्रयतक्शील राहिले. दलितांना आपल्यावरील अन्यायाची जाणीव करून देण्याचे कार्य पूर्व खानदेशातील काही शिक्षक सुधारणावाद्यांनी सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एडवोकेट जाधव आदींनी दलितांच्या हक्काच्या दृष्टीने खानदेशातील सभा, बैठकांतून मार्गदर्शन केले. हळूहळू अस्पृश्य समाजाला आपल्या अस्तित्त्वाची जाणीव होऊ लागली.

**महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह-** २० मार्च १९२७ रोजी महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली प्रधानबंधुच्या समवेत खानदेशातील अनेक कार्यकर्ते सहभागी झालेत. प्रधानबंधुंपैकी बाळासाहेब एडवोकेट भा. वि. प्रधान हे जळगाव येथील चोखामेळा वसतिगृहाचे अध्यक्ष आणि जळगाव नगरपालिकेचे अध्यक्ष होते. समता समाज संघाचे ते सेक्रेटरी म्हणूनही राहिले. महाड येथील सत्याग्रह परिषदेच्या समारोप प्रसंगी पश्चिम खानदेशातील खादी प्रसार मंडळाचे आद्यप्रवर्तक रा. शंकर श्रीकृष्ण देव यांचे व्याख्यान (२७ डिसेंबर १९२७) ठेवण्यात आले होते. यावेळी खानदेशातील ठिकठिकाणच्या अस्पृश्य बांधवांनी सभा, बैठका घेऊन महाड सत्याग्रहाला समर्थन देणारे ठराव मंजूर केलेत. हे वर्ष महाडचा चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष आहे. शताब्दी वर्ष साजरे होत असताना शंभर वर्षांपूर्वीची सामाजिक व्यवस्था कशी होती याची कल्पना आपण करू शकतो.

**नाशिक येथील मंदिर प्रवेश सत्याग्रह-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील मममंदिरप्रवेश सत्याग्रहातफ नाशिक येथे खानदेशातील अस्पृश्य सत्याग्रही स्त्री-पुरुष सामील झाले. २,३ मार्च, १९३० यादिवशी झालेल्या या सत्याग्रहाला समर्थन देत असतांना खानदेशातील दलित, अस्पृश्य समाजाला समतेच्या लढ्याच्या दृष्टीने मोठी प्रेरणा मिळाली. सुधारणावादी कार्यकर्ते, समाजसेवकांनी अस्पृश्यतानिवारणाच्या कार्याला वाहून घेतले. मंदिरप्रवेशासाठी खानदेशातही ठिकठिकाणी चांगला प्रतिसाद मिळत गेला. डॉ. आंबेडकरांचा दलित जागृतीसाठी खानदेशातही चांगला संपर्क राहिला. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या विविध आंदोलनांना खानदेशातून प्रतिसादही चांगला मिळाला. खानदेशात मंदिरप्रवेश सत्याग्रहात साने गुरुजींनी आपल्या अनुयायांच्या मदतीने सक्रिय सहभाग घेऊन ठिकठिकाणची मंदिरे अस्पृश्यांना खुली केली.

**बलुतेदारी व्यवस्था -** खानदेशात बलुतेदारी व्यवस्था ही परंपरागत असून सुतार, लोहार, चांभार, महार, कुंभार, न्हावी, परीट, मांग, गुरव, जोशी, भाट, काझी (मुलाणा) असे बाराबलुतेदार शेतकऱ्याच्या गरजा भागवून मोबदल्यात मबलुतफ स्वीकारत. त्यांना मकारूफ म्हणूनही ओळखले जाई. तर तेली, तांबोळी, साळी, शिंपी, माळी, गोंधळी, डवऱ्या, गोसावी, भोई, वाजंत्री, घडशी, भाट, कलावंत, सनगर यांसारखे अलुतेदार नारू हे देखील शेतकरी समाजाच्या नैमित्तिक गरजा भागवत असत. खानदेश जिल्ह्यात अमळनेर, नंदुरबार, चोपडा, यावल या तालुक्यात मामलेदार म्हणून काम करीत असतांना, ग्रामीण जीवनाचा जवळून अभ्यास श्री. त्रिं. ना. अत्रे यांनी केला आणि बलुतेदारी व्यवस्थेबद्दलचे अनुभव आपल्या गावगाडा ग्रंथात नमुद केलेत, १९३३ च्या नंतर महारांनी वतनीहक्क, गावकीची कामे सोडून देऊन या गुलामीतून सुटका करून घेण्याचे ठरविले. बलुतेदारी व्यवस्थेत या संबंधित घटकांचे शोषण पिढ्यानपिढ्या होत राहिले म्हणून बलुतेदारी विरोधात वातावरण हळूहळू निर्माण होत गेले. महारवतन खालसाकरून त्यांना पुरेशी जमीन दिली जावी, अशी मागणी पुढे आली. यातून चळवळ उभी राहिली. परावलंबीत्व, शोषण, अस्पृश्यांची नित्कृष्ठ सामाजिक-आर्थिक स्थिती, यामुळे होणारा जुलूम असे दोष या बलुतेदारी व्यवस्थेत असल्यामुळे यातील घटकांनी या व्यवस्थेविरूद्ध संघर्षाची तयारी ठेवली.




**हिंदू-मुस्लिम संबंध -** खानदेशात १९ व्या शतकाच्या शेवटच्या काळापासून हिंदू-मुस्लिम संबंधात कधी तणाव तर कधी संघर्षाचेही स्वरुप दिसून येते. हिंदू समाज आणि खानदेशातील मुस्लिम यांच्यात १९२५ साली धुळ्यात जातीय दंगल झाली. धुळे येथील गणपती उत्सवात हा प्रकार घडून आला. अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीची मिरवणूक निघाली असताना मिरवणुकीस हरकत घेणारे मुस्लिम बांधव मुल्लाच्या मशिदीजवळ कलेक्टर मि. क्यूमिन यांच्या उपस्थितीत एकत्र झाले असताना हा वाद उत्पन्न झाला. मशिदीत सुमारे ४०० मुसलमान एकत्र आले होते. मिरवणुकीच्या वेळेस ते बाहेर आल्यावर कलेक्टर साहेबांनी त्यांची समजूत काढली. परंतु अंगावर येणारे दगड एका मुसलमानाने क्युमिनसाहेबांना मशिदीच्या आत खेचून घेण्याचा प्रयत्न आणि दुसऱ्याने उगारलेली काठी हे लक्षात येताच पोलीस अधिकाऱ्यांनी स्वतःहून गोळीबार केला. यात चार मुसलमान मारले गेले व २८ जखमी झाले. मशिदीपुढे वाद्य वाजवण्याच्या वादातून ही परिस्थिती निर्माण झाली. या दंगली संबंधीचे वर्णन मअजून तरी डोळे उघडतील काय? या केसरी च्या अग्रलेखात आढळते.

याउलट, हिंदू मुस्लिम बांधव खानदेशात सामंजस्याने राहत असल्याचेही दिसते. काही उदाहरणांवरून सांगता येते. शिंदखेड्यात सुमारे १२०० लोक आहेत, ते गुण्यागोविंदाने नांदत आहेत, दूध, शेती व्यवसायात मुस्लिमांचाही सहभाग आहे.अशी माहिती शंकर विनायक ठकार व येथील शंकर श्रीकृष्ण देव यांनी हिंदू-मुसलमान प्रश्नावर दिलेली दिसून येते.

विशिष्ट सणानिमित्त निघणाऱ्या मिरवणुकीत मशिदीवरुन जाताना वाद्य, टिपऱ्या वाजवणे बंद असावे, अशी मुस्लिमांची मागणी असे. यातून संघर्ष होऊ नये म्हणून सलोख्याचे प्रयतक होत असत. शहादा येथील गणेश उत्सवात निघणाऱ्या मिरवणुकीत हिंदू मुस्लिम सलोखा रहावा. मशिदीवरून मिरवणूक जाताना मशिदीपासून ४०-४५ फूट अंतरावरच वाद्ये वाजवावीत. या व्यवस्थेवर एकमत घडविण्याचा प्रयत्न झाला. परंतु मुस्लिमांची अट ५० फुटांची असल्याने हा समेट होऊ शकला नाही. असे तत्कालीन इतिहासात नमूद केले आहे. पश्चिम खानदेशातील कुकुरमुंडे येथील खंडोजी महाराज उत्सवाच्या वेळी हिंदू मुस्लिमांत असाच वाद १९२६ मध्ये निर्माण झाला होता. यात काही मुस्लिमांची घरे आणि मशीद या वादात उध्वस्त झाल्याने हिंदू बांधवांनी वर्गणी करुन ती बांधून दिली असल्याची माहिती मिळते.

तत्कालीन पश्चिम खानदेशातील निजामपूर येथील हिंदू-मुस्लिम बांधवांत आषाढी एकादशी व मोहरमनिमित्त निघणाऱ्या मिरवणुका शांततेत पार पडून सलोख्यातून हे उत्सव साजरे केले जात. वालझिरी या चाळीसगावहून दोन मैल अंतरावर असलेल्या ठिकाणी महादेवाच्या यात्रेनिमित्त महाशिवरात्रीस निघणाऱ्या दिंडीत हिंदू मुस्लिमांच्या सलोख्याचे संबंध दिसून येतो.दोन्ही जमातींत यावेळी एकोपा टिकवून ठेवण्याचे प्रयतक होऊन चाळीसगाव येथे देखील अशाच प्रकारचा समेट झालेला दिसून येतो. पूर्व खानदेशातील फैजपूर येथे आषाढी एकादशीची दिंडी पालखी मुस्लिम मशिदीवरुन जात असताना दगडफेक होऊन हिंदू मुस्लिम संघर्ष सुरु झाला. दोन मुस्लिम ठार झाले होते.

हिंदू-मुस्लिम संबंधात बळजबरीने होणाऱ्या धर्मांतरातून देखील संघर्ष झाल्याचे दिसते. पूर्व खानदेशातील भडगाव जवळील वडजी येथे वाद्य वाजवण्याच्या प्रश्नावरून हिंदू मुस्लिम बांधवांत संघर्ष होऊन दोन्ही पक्षांतील लोकांवर खटले भरण्यात आले या तणावाचा परिणाम म्हणून येथील हिंदूंनी मुस्लिमांवर सामाजिक बहिष्कार घातला त्या वादात काही मुस्लिमांनी गाव सोडले.

हिंदू-मुस्लिम तणावातून शेंदुर्णी येथील मधील जातीय तणाव, १९३० मधील म्हसवे (पारोळा) येथील तणाव, १९३८ मधील एरंडोल येथील तणाव यासारख्या घटना घडल्या. १९३८ मध्ये पश्चिम खानदेशातील लामकानी येथे मशिदीवरून पालखीची मिरवणूक नेण्याच्या प्रश्नावरून हिंदू-मुस्लिम संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. परंतु तडजोडीचे प्रयत्न होऊन डिसेंबर १९३८ मध्ये दोन्ही गटांच्या पंचांनी सलोखा निर्माण केला आणि तसा करारनामा लिहून घेण्यात आला. यानुसार मिरवणूक मशिदीमागून न्यावी तसेच मुस्लिम नमाजाची वेळ हिंदूंनी लक्षात घेऊन मिरवणुकीसंबंधीचे धोरण ठरवावे, असे ठरले. दोन्ही जमातींत शांतता प्रस्थापित करण्यात आली. नांदगाव (नासिक) येथे ७/४/१९३९ रोजी जुम्मा मशिदीवरून मिरवणूक काढण्याच्या प्रश्नावरून तणाव वाढला. परंतु दोन्ही गटांत तडजोड होऊन शांतता प्रस्थापित करण्यात आली. जळगाव येथील १९३९ मधील मोठी दंगल हिंदु-मुस्लिम तणावाचे उदाहरण म्हणून दिसून येते. राममंदिराच्या पालखीची मिरवणूक जुम्मा मशिदीवरून जाताना हिंदूंनी वाद्य वाजविणे बंद केले असले तरी मबालाजी की जयफ अशा घोषणा दिल्याने संघर्ष झाला.शांतता समितीची स्थापना होऊन हिंदू-मुस्लिम तणाव कमी करण्याचा प्रयत्न झाला. हिंदू-मुस्लिम संघर्षात जळगावमधील बालाजी पेठ, जैनाबाद, भिलपुरा, कोळी पेठ, शनिपेठ, जोशीपुरा, काट्याफाईल या भागांचा अधिक संबंध असलेला दिसतो. ब्रिटिश प्रशासनाच्या धोरणामुळे देखील हिंदू मुस्लिम संबंधात तणाव निर्माण झाल्याची ही उदाहरणे दिसतात.

---



सीए नरेंद्र नेरपगार
मो.९६७३७३०८९५

अर्थवेध

# आयकर कायदा २०२५ अंतर्गत भांडवली नफ्यावर कर आकारणी

आजच्या काळात गुंतवणूक ही प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक जीवनाचा महत्त्वाचा भाग बनली आहे. पूर्वी लोक फक्त बचत खात्यात पैसे ठेवणे किंवा सोने खरेदी करणे यालाच सुरक्षित गुंतवणूक मानत होते; परंतु आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आज अनेक लोक जमीन, घर, फ्लॅट, शेअर्स, म्युच्युअल फंड, बाँड्स, डिजिटल मालमत्ता आणि इतर विविध साधनांमध्ये गुंतवणूक करत आहेत. गुंतवणुकीचा मुख्य उद्देश म्हणजे भविष्यात अधिक आर्थिक फायदा मिळवणे. मात्र जेव्हा ही मालमत्ता विकली जाते आणि त्यातून नफा मिळतो, तेव्हा त्या नफ्यावर सरकारकडून कर आकारला जातो. या कराला भांडवली नफा करअसे म्हण- तात.

भारतीय आयकर कायद्यात भांडवली नफा हा अत्यंत महत्त्वाचा विषय मानला जातो. कारण आज अनेकलोकमालमत्ताविकतात, शेअर्समधून नफा कमावतात, सोने विकतात किंवा म्युच्युअल फंडातून पैसे काढतात. अनेक वेळा लोकांना असे वाटते की फक्त मोठे उद्योगपती लोकांनाच भांडवली नफ्यावर कर लागू होतो; परंतु प्रत्यक्षात सामान्य मध्यमवर्गीय व्यक्तीलाही हा कर लागू होऊ शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीने काही वर्षांपूर्वी कमी किमतीत जमीन घेतली आणि आता ती जास्त किमतीत विकली, तर त्या फरकावर कर लागू होऊ शकतो. त्याचप्रमाणे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून नफा कमावणाऱ्या व्यक्तींनाही भांडवली नफ्यावर कर भरावा लागू शकतो.

आयकर कायदा २०२५ मध्ये भांडवली नफ्याबाबत अनेक महत्त्वाचे नियम लागू आहेत. सरकारने कर प्रणाली अधिक सोपी आणि पारदर्शक करण्यासाठी काही बदल केले आहेत. काही प्रकरणांमध्ये कर दर बदलले गेले आहेत, काही सूट योजनांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे आणि काही ठिकाणी (निर्देशांक) सारख्या सुविधांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे प्रत्येक गुंतवणूकदाराने नवीन नियम समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. चुकीची माहिती किंवा नियमांचे अज्ञान यामुळे अनेक वेळा लोकांना अतिरिक्त कर भरावा लागतो किंवा आयकर विभागाकडून नोटीस येऊ शकते.

**भांडवली नफा आणि व्यवसाय उत्पन्न यातील फरक**

जर तुम्ही मालमत्ता खरेदी-विक्रीचा व्यवसाय करत असाल, म्हणजे वर्षभरात अनेक वेळा मालमत्ता खरेदी-विक्री केली असेल, तर यावरील नफा भांडवली नफा मानला जात नाही. हे व्यवसायाचे उत्पन्न मानले जाते. भांडवली नफा म्हणजे तुम्ही गुंतवणूक म्हणून किंवा तुमच्या स्वतःच्या वापरासाठी खरेदी केलेल्या मालमत्तेला, भांडवली मालमत्ता मानली जातेआणि त्याच्या विक्रीतून मिळालेल्या नफ्याला भांडवली नफा असे म्हणतात.

समजा, एखादा बिल्डर नियमितपणे जमीन किंवा फ्लॅट खरेदी करून त्यावर इमारती बांधतो आणि नंतर त्या मालमत्ता विकतो. तो वर्षभरात अनेक वेळा खरेदी-विक्री व्यवहार करतो आणि त्यातून नफा कमावतो. अशा परिस्थितीत हा व्यवहार व्यवसायाचे उत्पन्न मानला जातो.

याउलट एखाद्या सामान्य व्यक्तीने स्वतःच्या गुंतवणुकीसाठी किंवा भविष्यातील सुरक्षिततेसाठी एक फ्लॅट खरेदी केला. काही वर्षांनंतर त्या फ्लॅटची किंमत वाढल्यानंतर तो फ्लॅट विकला आणि त्यातून नफा मिळवला. अशा परिस्थितीत हा नफा भांडवली नफा म्हणून ओळखला जातो.

**भांडवली मालमत्ता म्हणजे काय?**

आयकर कायद्यानुसार ज्या मालमत्तेवर भांडवली नफा लागू होतो, त्या मालमत्तेला भांडवली मालमत्ता असे म्हणतात. भांडवली मालमत्तेमध्ये विविध प्रकारच्या मालमत्तांचा समावेश होतो, जसे की निवासी घर, फ्लॅट, जमीन, दुकान किंवा ऑफिस, सोने आणि दागिने, शेअर्स, म्युच्युअल फंड, बाँड्स, परदेशी गुंतवणूक तसेच काही डिजिटल मालमत्ता. या सर्व मालमत्ता गुंतवणूक म्हणून किंवा संपत्ती वाढवण्यासाठी घेतल्या जातात आणि भविष्यात विक्री करून त्यातून आर्थिक लाभ मिळवला जातो.

मात्र काही गोष्टी भांडवली मालमत्ता म्हणून गणल्या जात नाहीत. उदाहरणार्थ वैयक्तिक वापराच्या वस्तू, कपडे, फर्निचर आणि रोजच्या वापरातील वस्तूयांचा भांडवली मालमत्तेत समावेश होत नाही, कारण त्या गुंतवणुकीसाठी नसून वैयक्तिक वापरासाठी असतात. तथापि, सोने, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तूंना अपवाद मानला जातो आणि त्यांचा समावेश भांडवली मालमत्तेमध्ये केला जातो.

**आयकर कायद्यानुसार भांडवली मालमत्तेचे प्रकार:**

आयकर कायदा २०२५ नुसार, मालमत्ता किती कालावधीपर्यंत धारण केली आहे यावरून ती अल्पकालीन भांडवली मालमत्ता किंवा दीर्घकालीन भांडवली मालमत्ता म्हणून वर्गीकृत केली




जाते.

**१) अल्पकालीन भांडवली मालमत्ता :**

घर, फ्लॅट, जमीन किंवा इतर स्थावर मालमत्ता जर खरेदी केल्यानंतर २ वर्षांच्या (२४ महिन्यांच्या) आत विकली गेली, तर ती अल्पकालीन भांडवली मालमत्ता मानली जाते.

सूचीबद्ध शेअर्स आणि इक्विटी म्युच्युअल फंड, जर १२ महिन्यांच्या (१ वर्षांच्या) आत विकले गेले, तर ते अल्पकालीन भांडवली मालमत्ता म्हणून गणले जातात.

अल्पकालीन भांडवली मालमत्तेच्या विक्रीतून होणाऱ्या नफ्यावर जो कर भरावा लागतो, त्याला अल्पकालीन भांडवली नफा कर असे म्हणतात.

**२) दीर्घकालीन भांडवली मालमत्ता :**

घर, फ्लॅट, जमीन किंवा इतर स्थावर मालमत्ता २४ महिन्यांपेक्षा जास्त काळ धारण करून विकल्यास ती दीर्घकालीन भांडवली मालमत्ता मानली जाते.

सूचीबद्ध शेअर्स आणि इक्विटी म्युच्युअल फंड हे १२ महिन्यांपेक्षा जास्त काळ धारण करून विकल्यास ते दीर्घकालीन भांडवली मालमत्ता म्हणून गणले जातात.

दीर्घकालीन भांडवली मालमत्तेच्या विक्रीतून होणाऱ्या नफ्यावर जो कर भरावा लागतो, त्याला दीर्घकालीन भांडवली नफा कर असे म्हणतात.

**भांडवली नफा कर दोन प्रकारचा असतो:**

**१) अल्पकालीन भांडवली नफा कर :**

नवीन केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार (आर्थिक मालमत्तांवर), जसे की शेअर्स, म्युच्युअल फंड आणि इतर वित्तीय मालमत्ता, यावर अल्पकालीन भांडवली नफ्याचा कर दर २०% करण्यात आला आहे.

घर, फ्लॅट, जमीन किंवा इतर स्थावर मालमत्ता विक्री पासून अल्पकालीन भांडवली नफ्यावर सरकारनेकोणताही ठराविक वेगळा कर दर जाहीर केलेला नाही. अशा नफ्याची रक्कम तुमच्या एकूण उत्पन्नात जोडली जाते आणि त्यानंतर तुमच्या करपात्र उत्पन्नावर लागू असलेल्या कर स्लॅबनुसार कर आकारला जातो.

**२) दीर्घकालीन भांडवली नफा कर :**

सध्याच्या नियमांनुसार सूचीबद्ध शेअर्स आणि इक्विटी म्युच्युअल फंडांवर दीर्घकालीन भांडवली नफा कर दर १२.५% आहे, मात्र वर्षाला १२५००० रुपयांपर्यंतचा नफा पूर्णपणे करमुक्त असतो. म्हणजे या मर्यादेपर्यंत नफ्यावर तुम्हाला कर लागत नाही.

स्थावर मालमत्ता (घर किंवा जमीन) आणि सोने यावर १२.५% दीर्घकालीन भांडवली नफा कर लागू होतो.

**इंडेक्सेशन/महागाई निर्देशांकम्हणजेकाय:**

आयकर कायद्यानुसार इंडेक्सेशन म्हणजे महागाई निर्देशांक वापरून मालमत्तेची खरेदी किंमत आणि सुधारणा खर्च महागाईनुसार बदल करून मोजणे. म्हणजेच, जुनी खरेदी किंमत आणि मालमत्तेवर केलेला सुधारणा खर्च महागाई लक्षात घेऊन वाढवून धरला जातो, ज्यामुळे प्रत्यक्ष भांडवली नफा कमी दिसतो आणि कराचा भार कमी होतो.

मात्र २३ जुलै २०२४ पासून दीर्घकालीन भांडवली नफा कर नियमांमध्ये महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. या बदलानुसार बहुतांश मालमत्तांसाठी इंडेक्सेशनची सुविधा काढून टाकण्यात आली आहे. पूर्वी जिथे महागाईनुसार खरेदी व सुधारणा खर्च वाढवून नफा मोजला जात होता, ती पद्धत आता बहुतेक गुंतवणुकांमध्ये बंद करण्यात आली आहे.

आता सर्वसाधारण नियम असा आहे की कर मोजताना फक्त प्रत्यक्ष खरेदी किंमत आणि विक्री किंमत यातील फरक भांडवली नफा विचारात घेतला जातो. त्यामुळे करपात्र नफा जास्त दिसू शकतो आणि कराचा भार वाढू शकतो.


तथापि, जमीन किंवा घराच्या बाबतीत जर मालमत्ता २३ जुलै २०२४ पूर्वी खरेदी केलेली असेल, तर अशापरिस्थितींमध्ये करदात्याला दोन पर्याय उपलब्ध होऊ शकतात. पहिला पर्याय म्हणजे महागाई निर्देशांक लागू करून दीर्घकालीन भांडवली नफा वर २०% दराने कर भरणे. दुसरा पर्याय म्हणजे महागाईचा विचार न करता नफा मोजून १२.५% दराने कर भरणे.

मात्र, २३ जुलै २०२४ नंतर खरेदी केलेल्या मालमत्तेसाठी इंडेक्सेशनचा लाभ उपलब्ध नसतो आणि कर गणना फक्त प्रत्यक्ष खरेदी किंमत व विक्री किंमत यांच्या आधारेच केली जाते.

या बदलामुळे गुंतवणूक करताना आधीपेक्षा अधिक काळजीपूर्वक विचार करणे गरजेचे झाले आहे. कारण आता नफा मोजताना कोणतीही वेगळी सवलत न धरता थेट खरेदी आणि विक्रीच्या किमतीवरच कर आकारला जातो. त्यामुळे गुंतवणूक किती काळ ठेवायची, तिचा उद्देश काय आहे आणि त्यातून किती परतावा अपेक्षित आहे, हे आधीच स्पष्ट असणे महत्त्वाचे ठरते. योग्य नियोजन केल्यास भविष्यात आर्थिक निर्णय अधिक सोपे आणि फायदेशीर होऊ शकतात.

---

# तमाच्या तळाशी दिवे लावू या!!!




प्रा. प्रभा बैकर
मो. ९३२६९७९९०८

आजची सून उद्याची सासू हा विषय असा आहे की, या एकाच विषयावर महाभारत लिहिले जाईल! तरीही विचार मंथन नक्कीच करायला हवे, अग अग सूनबाई, काय म्हणता सासूबाई? या चित्रपटात या विषयाला हात घातलाच खरा, पण तो फक्त हिमनगासारखा,हिमनग तसा फक्त एक अष्टमांश पाण्यावर दिसतो, पण त्याखाली सप्तमांश भाग पाण्यातच असतो! सुरवातीला दोघींमधली तू... तू... मै.... मै... अशी अवस्था आणि मुलगा.. तळ्यात मळ्यात .. कधी.. आईच्या बाजूने तर कधी लाडक्या बायकोच्या .... अशा अवस्थेत आणि सासराही... दोघींना सांभाळायचा प्रयत्न करणारा बिचारा नंतर एका दुर्घटनेत मुलगा आणि बाप या दोघांचा भीषण मृत्यू... यामुळे जगणं असह्य झालेल्या त्या दोघी... आणि जेंव्हा नातवंडाची चाहुल लागते तेंव्हा मात्र त्या दोघी एकमेकींच्या जवळ येतात. सासू तिचा आधार बनते आणि तीही सासूला समजून घेण्याचा निदान प्रयत्न तरी करते. ही पश्चात बुद्धी काय कामाची? त्यापेक्षा आजची सासू झालेली आहे तिनं विचार करावा की, मी कशी जगतो त्यापेक्षा आजच जग, वातावरण, जीवन शैली बदलली आहे. कदाचित मला माझ्या मनासारख जगता आला नसेल, म्हणून मीही सुनेला त्याच पद्धतीनं वागवल पाहिजे का?

त्यातही सून नोकरी करणारी असेल तिला ठराविक वेळेत नोकरीसाठी बाहेर पडावं लागत असेल, तरीही तिनं भल्या पहाटे उठून, सासूच्या हातात सकाळचा चहा द्यावा. नाश्ता बनवावा आणि देवपूजा वगैरे करावी अशी अपेक्षा करणं चुकीचच नाही का? ही बदललेली जीनवशैली, सासूने स्विकारायला हवी. आमच्या वेळी नव्हत बाई अस... असं चंदन उगाळत बसू नये.

लेक लाडकी या घरची, होणार सून मी त्या घरची अस गीत गात गात स्वप्नांच इंद्रधनुष्य पहात पहात ती मुलाच्या बरोबर उंबरठ्यावरच माप ओलांडून गृहलक्ष्मी या नात्यानं आपल्या घरी येते. त्याच वेळी

लिंबलोण उतरता अशी का झालीस ग बावरी

मुली तू आलीस आपुल्या घरी

असे म्हणत तिला कुशीत घ्यायला हव! आपल घर आपली माणसे, आपलं गाव, अस सगळं सोडून ती आपल्याकडे येते तिला विश्वास द्यायला हवा की, मुली हे घर, ही माणसं, तुझीच आहेत. मान्य आहे की, सून वेगळ्या वातावरणात वाढलेली असेल, आपल्या घरच्या रितीभाती, कुळाचार समजायला वेळ लागेल, तो वेळ तिला द्यायलाच हवा. टाळी दोन्ही हातांनी वाजते, तशी तडजोड दोन्हींनी करायला हवी. लाईफ इज अॅन अॅज्जेस्टमेंट हे सुखी संसाराच तत्वज्ञान आहे.

स्त्री हीच खरी संस्कृती पूजक आणि रक्षणकर्ती आहे. अन्यथा प्रेमविवाह करणारी जोडपी सुद्धा, वर्ष, दोन वर्षात घटस्फोट घेतात अशी उदाहरण आपण पाहतो.

एक विसाव शतक उजाडल, स्त्रीस्वातंत्र्याचे कितीही गोडवे गायिले, तरीही स्त्रीजीवन सुखावह झाले आहे. असे म्हणता येणार नाही. मुलगी वाचवा, स्त्रीभ्रूणहत्या करु नये हे आजही पुरुषाला सांगाव लागत. तिसरी मुलगी झाली म्हणून तीन दिवसाच्या तानुकीचा गळा घोटणारे निर्दयी बाप अजुनही समाजात वावरत आहेत. पत्नीवर संशय घेणारे नवरे, म्हणून एखादी अभागी माता पोटच्या तान्हुल्यासकट विहीर जवळ करते!

वैशाली हगवणे,निर्भया... अशी अनेक उदाहरण.... स्त्री जन्मा ही तुझी कहाणी, हृदयी अमृत नयनी पाणी म्हणाव अशी सांगता येतील. स्त्रीन उत्तुंग आकाशात झेप घेतली आणि अथांग सागरातही...ती अंतराळात विमानही चालवते. आणि आगगाडीही ...तरीही.. तरीही वरिष्ठ अधिकारी असूनही ती सुखाने जगू शकत नाही. स्त्री जातीचा सन्मान करण्या ऐवजी, तहानग्या चार वर्षाच्या कोवळ्या कलिकेवरही अत्याचार करणारे नराधम आजही समाजात वावरतांना दिसतात. यासाठी आपणच बदलायला हव. एका दिव्यान हजार दिवे लावता येतात. सगळ जग प्रकाशमान होत. तमाच्या तळाशी दिवे लावावे ना, तसं प्रत्येक सासूनं बदलायला हव आणि सुनेनही सासूला समजून घ्यायला हव. सुखी संसाराच गुपित हेच आहे. नाही का? तुम्हाला काय वाटत? विस्तार भयास्तव, लेखणीला विराम देते! मी आजची सासू येउ द्या सुनेच्या ओठावर हसू!!

# शब्दझुला



## मनाचा गाभारा

अस्थिर मनाच्या गाभाऱ्यात
दुःखाची एक नदी वाहते
सुख सुविधा असतांनाही
या मनाला एकटे वाटते
बाहेर दिसे झगमगाट
आत मात्र काळोख दाटला
जणू नात्यांचा ओलावा आणि
संवादाचा झरा आटलेला
गर्दीतले हजार चेहरे
नि नजर शोधते कुणाला
उगाचच काहूर माजते
प्रश्न पडतो वेड्या जिवाला
सर्वच काही हातात आहे
पण भरत नाही ही झोळी
शांततेच्या आरशात दिसे
फक्त स्वप्नांची रिकामी होळी
नको हे दिखाऊ मुखवटे
हवा केवळ मनाचा स्पर्श
साथ सुखाची भेटल्यावर
होईल की दुःखालाही हर्ष

– सुधीर महाजन, जळगाव
मो.९२७३७७७५१४

## वात्सल्यसिंधू आई

वात्सल्यसिंधू आई माझी तू
दया, माया, ममतेचा
सागर ही तू !!
गर्भातच संस्कार करूनी
प्रेमानं हितगुज करूनी
डोहाळे सारे तुझे पुरवुनी
आवड निवड
माझी सारी जपुनी
असह्य प्रसुती वेदना साहुनी
जन्म दिला मला तू माऊली !!
कर्तव्यदक्षतेने तुझिया आई
उच्चपदी विराजमान झाले मी
सुसंस्कारांनी तुझ्या गं आई
दोन्ही कुळांची माझ्या शान वाढली
धन्य धन्य तू माय माऊली
माझ्या जीवाची
तू गं साऊली !!
झाले बघ आता मी ही आई
माझ्या बाळाला जन्म देवुनी
तुझ्यासम माया ममता ही सारी
आली गं आई माझ्याही ह्रदयी
चिमण्या पाखराला या माझ्याही
वाढवीन मी ही
जिवापाड जपुनी !!
झाले जरी आई मी गं मोठी
माया मूर्त तुझीच मी पाही
तुझी माया,ममता गं न्यारी
ना मिळे कधी
कुठल्याही बाजारी
कसली ही उणीव नसली तरी
आई तुझ्याविना
गं मी भिकारी !!
जीवनाची मम करुण कहाणी
कुणी पुसे ना तुज वाचुनी
येशील परतून कधी गं आई ?
सांग ना हळूच तू माझ्या कानी
तुझिया कुशीत सामावण्याची
आस पुरवाया पुन्हा
तू ये ना आई
आई माझी !!

– विमल प्रकाश पाटकरी
मो.–९०२८०५५९११

## वैशाख मृग

मृग नक्षत्र आभाळ
सृष्टीचे सघन मित्र
सृष्टी वाट पाहे पर्जन्याची
चातका प्रमाणंधृ
नित्य ऋतुचक्र आहे
आदीम काळापासून
फिरता काळ सुख
दुःखाचा प्रत्यय देत
सृष्टीचा शृंगार
विलसतो आकाशापर्यंत१
सूर्य तळपतो सर्वत्र
वैशाख मासांत
तप्त उन्हांत सृष्टीतील
झाडे उभी दिमाखांत
वैशाखाची काहिली
कमी होते चैत्रपालवीनं२
मृग चाहूलीने मुंग्या
कीटक प्रसवतांत
मातीतून उगवलेले
भासे वैभव संपन्न
मानव सृष्टीचा जुळतो
भावनिक भावबंध३
पक्षी तृणांकूर सावळ्या
घनाची वर्दी देत
वळीवाचे चाहूलीने
कृषक करी नांगरट
विजा लवतात वादळ
वारा मेघ बरसत ४
गुरे ऊंडारतात
पाखरे करिती कलकलाट
शुष्क भूमी सृष्टी तृप्त
होते मृगाचे पावसानं
वरूण देवाचे कृषीवलांचे
मानू ऋण ५

– अरुण गांगल, कर्जत
मो.९३७३८११६७७

# स्वराज्यमुद्रा

**(पान ३ वरुन)** जात असे. याचे कारण म्हणजे ज्येष्ठ असलेल्या मंडळीला पाठविलेले पत्र हेआदेश नसायचे तर त्या व्यक्तिप्रती असलेला आदर आणि आपुलकी दाखविण्याच्या दृष्टीने मुद्राही पत्राच्या पाठीमागे उमटविली जात असे.

लोककल्याण- छत्रपती शिवाजी महाराजांनी राजमुद्रेतुन लोककल्याणाचे ध्येय ठेवले. स्वराज्याची राजमुद्रा जगाला नेहमी सांगत राहीली की, प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे शहाजीराजे पुत्र छत्रपती शिवाजी महाराजांची दिवसेंदिवस वाढणारी सत्ता विश्ववंदित होत आहे. ती रयतेच्या कल्याणासाठी विकसित आहे. छत्रपतींचे हित रयतेच्या हितात सामावलेले आहे. आपल्या जनतेचे काल्याण करणारे छत्रपती हे महानराजे होत. आपले स्वतंत्र स्वराज्य, आपला स्वतंत्रराजा असेअभिवचन रयतेला देण्यासाठी राज्याभिष कसोहळा व स्वतंत्र मुद्रा तयार करणे आवश्यक होते. ते छत्रपतींनी केले व स्वतंत्र स्वराज्याचे छत्रपती म्हणून सर्वमान्य झाले.

**मुद्रेचे वैशिष्ट्य-** छत्रपतीच्या स्वराज्य मुद्रेचे वैशिष्ट्य म्हणजे छत्रपतींनी वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी स्वतःची मुद्रा घडविली ती पुन्हा कधीही बदलावी लागली नाही. त्यामध्ये भर घालावी लागली नाही, फेरफार करावा लागला नाही. आयुष्यात आपल्याला काय करायचे आहे, याबद्दलची इतकी स्पष्ट संकल्पना अन्य कोणा राजाकडे आढळून येत नाही. हा त्यांचा फारमोठा गुण होता. सर्वाचे हित हेच स्वराज्याचे ध्येय होते आणि ते सिध्दही करून दाखविले. स्वराज्यातील प्रधानांसाठी ही शिक्का करवून घेतला. हा प्रधानांचा शिक्का इ.स.१६५३ पासुन वापरात होता.

**श्रेष्ठ विचारधारा-** राज्याभिषेका नंतर छत्रपतींनी स्वतःस क्षत्रिय कुलावंत श्री.राजा शिवछत्रपति हे बिरू दलावले. राज्याभिषेकाच्यावेळी राजा म्हणून सिंहासनारोहण केले. त्यावेळी क्षत्रिय 'कुलावंतसराजाशिवछत्रपती' ही पदवी घेतली. अशा या पदवीत स्वराज्यातील रयतेचे सर्व हित सामावलेले आहे. प्रतिपचंद्र रेखेवही मुद्रा पाहिली म्हणजे छत्रपतीच्या ठिकाणी सामान्य माणसापेक्षा काहीतरी अधिक असुन सर्वापेक्षा वेगळी विचारधारा होती. त्यांनी राजमुद्रेतुन राज्यकारभारात पारदर्शकता व शासनव्यवस्थेतुन सक्षम सरकार देण्याचे सूत्र जगाला दिले.

**मर्यादा मुद्रा-** छत्रपतींच्या कालखंडामध्ये दोन प्रकारची मुद्रा वापरली जात असे. एक म्हणजे मुख्य मुद्रा म्हणून पत्राच्या माथ्यावर शिवमुद्रा असायची व पत्राच्याशेवटी मर्यादा मुद्रा ही पत्रातला मजकूर संपल्याची खूण मानली जात असे.

**मुद्रा अलौकिक** - शिवराजमुद्रेच्या तोडीची एक ही मुद्रा नाही इतकी ही मुद्रा अलौकिक आहे. शिवमुद्राही अष्टकोनी आहे. विशेष म्हणजे ही मुद्रा अतिशय योग्य मापानुसार आहे. या मुद्रेवर एकसे. मी.चे आठकोन आहेत. श्लोक बध्द असलेली ही एकमेव मुद्रा आहे. राजमुद्रेचा आशय बहुत भव्य व दिव्य आहे. विश्व वंदिता हे पद फारच महत्वपूर्ण आहे. हे पद स्वातंत्र्य व सत्ता यांचे दर्शन घडविते. ही मुद्रा दिवसेन दिवस वाढत जाऊन पोर्णिमेच्या चंद्रमंडला प्रमाणे परिपूर्ण आहे. सर्वत्र शांतता व सुखयांचे सम्राज्य पसरवून सर्व विश्वाला संतुष्ठ करून सुर्याच्या आदराला पात्र होईल आणि सर्वांचे मंगल करील एवढा विलक्षण व पवित्र आशय या मुद्रेत सामावलेला आहे.

छत्रपतींनी स्वराज्य मुद्रेतून मानवी लोककल्याणाचे ध्येय जगासमोर ठेवले. शासन व्यवस्थेत महत्वाचे स्थान बजावणारी ही मुद्रा सर्वश्रेष्ठ आहे. ही मुद्रा थोर, उदार व शुध्द प्रतिमेची असून सदैव्य लोककल्याणाची ग्वाही देते आहे. छत्रपतींची मुद्रा शुध्द आणि सत्य प्रतिमा आहे. यातून सहयाद्रिच्या दऱ्याखोऱ्यात उभारलेले स्वराज्य विश्वजनाच्या अभिवादनाला पात्र होणारे आहे.





डॉ.रोहन कुलकर्णी
MBBS, MD Medicine, IDCCM
कन्सल्टिंग फिजिशियन, इंटेंसिविस्ट
जवाहर एसीपीएम मेडिकल हॉस्पिटल,
साक्री रोड, धुळे. मो.९५०३४२०५१२

# उन्हाळा आणि आरोग्य सतर्कता हिच खरी सुरक्षा

उन्हाळा सुरू झाला की तापमान झपाट्याने वाढते आणि शरीरावर उष्णतेचा ताण येतो. या काळात सर्वात सामान्य पण धोकादायक दोन समस्या म्हणजे जुलाब आणि उष्माघात या दोन्ही समस्या स्वतंत्रपणे त्रासदायक असतातच, पण जर एकत्र आल्या तर परिस्थिती गंभीर होऊ शकते. शरीरातील पाणी आणि आवश्यक मीठ कमी झाल्यामुळे रुग्ण लवकर अशक्त होतो आणि कधी कधी जीवाला धोका देखील निर्माण होतो. त्यामुळे या विषयाची योग्य माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे.

उन्हाळ्यात जुलाब होण्यामागे मुख्य कारण म्हणजे दूषित पाणी आणि अन्न. रस्त्यावरचे उघडे अन्न, स्वच्छतेचा अभाव आणि बॅक्टेरिया किंवा व्हायरल संसर्ग यामुळे पोटाचे आजार वाढतात. दुसरीकडे, उष्माघात होण्याचे कारण म्हणजे प्रखर उन्हात जास्त वेळ राहणे, शरीरात पाण्याची कमतरता आणि जास्त घाम येऊन मीठ कमी होणे. लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि आधीपासून आजारी असलेले लोक यांना याचा जास्त धोका असतो.




या दोन्ही समस्यांमुळे शरीरावर गंभीर परिणाम होऊ शकतात. वारंवार पातळ जुलाब होणे, उलट्या, तीव्र तहान लागणे, अशक्तपणा आणि चक्कर येणे ही सुरुवातीची लक्षणे आहेत. जर वेळेवर उपचार झाले नाहीत तर रक्तदाब कमी होणे, लघवी कमी होणे, बेशुद्ध पडणे आणि मेंदूवर परिणाम होणे असे गंभीर परिणाम होऊ शकतात. विशेषतः जुलाब आणि उष्माघात एकत्र झाल्यास शरीरातील पाणी खूप जलद कमी होते आणि डिहायड्रेशन जीवघेणे ठरू शकते.

उपचाराच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शरीरात पाण्याची पातळी टिकवून ठेवणे. यासाठी भरपूर पाणी पिणे, (ओरल रिहायड्रेशन सोल्युशन) घेणे, तसेच ताक, लिंबूपाणी आणि नारळपाणी यांचा उपयोग करणे फायदेशीर ठरते. आहार हलका आणि पचायला सोपा असावा, जसे की भात, दही आणि केळी. जर जुलाब तासांपेक्षा जास्त काळ चालू राहिले, लघवी कमी झाली, किंवा रुग्ण खूप अशक्त वाटत असेल, तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. लहान मुलांमध्ये डोळे खोल गेलेले दिसणे हे गंभीर डिहायड्रेशनचे लक्षण आहे.

या आजारांपासून बचाव करण्यासाठी काही सोप्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. नेहमी स्वच्छ आणि उकळलेले पाणी पिणे, बाहेरचे उघडे अन्न टाळणे, उन्हात बाहेर जाताना टोपी किंवा छत्री वापरणे, आणि दुपारच्या कडक उन्हात बाहेर जाणे टाळणे आवश्यक आहे. शरीर हायड्रेट ठेवणे ही सर्वात महत्त्वाची सवय आहे. विशेषतः मुलांना आणि वृद्धांना अधिक काळजी घेणे गरजेचे आहे.

आजच्या काळात हवामान बदलामुळे उष्माघाताचे प्रमाण जगभरात वाढत आहे. त्यामुळे डिहायड्रेशन आणि उष्णतेशी संबंधित आजारांचे प्रमाणही वाढत आहे. भारतासारख्या उष्ण देशांमध्ये त्यात सध्या महाराष्ट्रात ही समस्या अधिक गंभीर बनत चालली आहे, त्यामुळे जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाय अत्यंत आवश्यक आहेत.

एकंदरीत पाहता, उन्हाळ्यातील जुलाब आणि उष्माघात हे दोन्ही आजार योग्य वेळी ओळखले आणि त्यावर उपाय केले तर टाळता येऊ शकतात. स्वच्छता, योग्य आहार आणि पुरेसे पाणी हेच यावरचे सर्वात प्रभावी उपाय आहेत. पाणी हेच जीवन आहे हे लक्षात ठेवून उन्हाळ्यात स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची योग्य काळजी घेणे हीच खरी सुरक्षितता आहे.

# ... तो आला आणि अंधार उजळून गेला

**(पान ३ वरुन)** मला खूप बरे वाटले आणि एका नव्या उमेदीने मग मी वस्तू विकायला सुरवात केली . चार पाच दिवसात मी खूप फिरलो आणि पाचव्या दिवशी दोन पुस्तके विकली...मला खूप आनंद झाला. अरुण पुढे सांगत होता.

स्वरूप ने आता या मुलाकडे जरा नीट निरखून बघितले . किडकिडीत शरीरयष्टी , सावळा रंग ,एका बाजूला नीट विंचरलेले केस ../ वर्षाचे वय. पण एक चमक त्याला या मुलात जाणवली . इतकावेळ उभाच असलेला स्वरूप आता सोफ्यावर बसला . अरुणचे सगळे सामान आता भरून झाले होते.

स्वरूपच्या लक्षात आले. हे रेगे सर या मुलांना नकार कसा पचवायचा याचे शिक्षण देत होते. आणि तेही नुसते पुस्तकी नव्हे ..जळजळीत अनुभवातून. हेच स्वरूपला आत्मसात करायची गरज होती. तुझे आई वडील काय करतात? स्वरुपने जरा कुतूहलाने विचारले. माझे वडील रिक्षा चालवतात. आई , ठिकाणी पोळ्या करायचे काम करते . तुमच्या घरी कोणी बाई माणूस नाही का ? त्यांना माझ्याकडची ही पावडर आवडली असती .. नाही रे ..माझे अजून लग्न झाले नाही . तुम्हाला पोळ्या करायला कोणी हवे आहे का ? माझी आई फार सुरेख पोळ्या करते . ती तुमचा पूर्ण स्वयपाक सुद्धा करेल . . स्वरूपला गम्मत वाटली. हा मुलगा आपले प्रयतक सोडत नव्हता. अरे आमच्या कडे एक बाई येतात...पण मला एक सांग तू इतक्या ठिकाणी फिरतोस ..काही ठिकाणी तुझ्या वस्तू विकल्या जातात तर काही ठिकाणी नाही ..तुला वाईट वाटल्यावर तू आता काय करतोस ? मागच्या सारखा रडतोस ? अरुण आता जरा मोकळे पणे बोलायला लागला होता नाही काका .आता मी रडत नाही . मी आता ही अडथळ्यांची शर्यत केली आहे .. स्वरूपला एकदम आश्चर्य वाटले .

म्हणजे काय रे ?

म्हणजे काका ,आमच्या शाळेत मी बऱ्याच वेळा अडथळ्यांच्या शर्यतीत भाग घेतो . एकामागोमाग अडथळे पार करत जायचे ..सगळे अडथळे पार झाले कि मग ती शर्यत संपते. या वस्तू विकायच्या म्हणजे तसेच आहे. पहिल्यांदा सोसायटीत प्रवेश मिळवायचा ..मग आपण काय विकतो आहे हे सांगून दार उघडण्याची वाट पहायची ..मग घरात प्रवेश मिळवायचा ..मग आपल्या वस्तू दाखवायच्या ..त्या कश्या चांगल्या आहेत हे सांगायचे ..मग त्या विकायच्या. मी किती वस्तू विकल्या या पेक्षा आज मी किती अडथळे पार केले असा विचार करतो मग मला तेव्हडे वाईट वाटत नाही ..मी किती अडथळे पार केले ..यातच मी आनंद मानतो ..

अडथळ्यांची शर्यत काय ? फार मस्त कल्पना आहे .. स्वरूपला एकदम कुणी तरी आपल्याला अंगावर गार पाणी टाकून गाढ झोपेतून उठवते आहे असे वाटले . आपल्याला हे नुसते वाचून माहिती आहे . हा मुलगा हे अमलात आणतो आहे. अरुण तू कितवीत आहेस ? स्वरूपने जरा कौतुकाने विचारले.

मी वी क मध्ये आहे काका . आमची मराठी शाळा आहे ..अ आणि ब मध्ये खूप हुषार मुले आहेत मी पण माझ्या तुकडीत पहिला येतो. आमचे रेगे सर म्हणतात हा मुलगा माझ्या पेक्षा हुषार असे म्हणू नका ..मागच्या परीक्षे पेक्षा तुला जास्त मार्क पडलेत कि नाही ..हे बघा ..तुमची शर्यत तुमच्याशी असू द्या. अरे वा ! या तुझ्या रेगे सरांना भेटायला पाहिजे . आणखी काय सांगतात हे सर? ..रेगे सर हा बहुतेक अरुणचा आवडीचा विषय असावा. त्याचा चेहरा एकदम उजळून निघाला आमचे तर ते देव आहेत. काका तुम्ही नक्की त्यांना भेटायला या. त्यांना आवडते असे लोकांना भेटायला. पण माझे नाव सांगा बरका?

नक्की भेटेन .

परवा काका एक गम्मत झाली . चार पाच दिवस मी बराच फिरलो पण माझी एक ही वस्तू विकली गेली नाही .. माझे काही तरी चुकते आहे हे समजून घ्यायला मी पुन्हा रेगे सरांकडे गेलो. त्यांनी मला मी काय काय करतो हे विचारले मग सगळे ऐकून झाल्यावर ते हसले आणि मला म्हणाले.. मला इंग्रजी चांगले समजते बर का काका ..मला काही ते फारसे समजले नाही ...आणि मला काहीच समजले नाही हे लक्षात आल्यावर सर एकदम हसले.

स्वरूप स्वतः होता. इंजिनिअर होता. त्याला हे चटकन समजले पण या लहान मुलाला काय समजले आहे हे पाहण्यासाठी तो म्हणाला,

मग रेगे सर काय म्हणाले ? ..

ते म्हणाले . अरुण तू अनेक अडथळे पार करतोस पण या सगळ्यात महत्वाचा अडथळा ..म्हणजे तू घरात प्रवेश मिळवणे ..हे जर तुला जमले नाही तर बाकीचे अडथळे पार करून काही उपयोग नाही . आणि ते जर करायचे असेल तर त्या घरात कोण कोण राहतात ? ते केव्हा घरी असतात ? आणि त्यांना काय विकायचा प्रयतक केला असता ते विकत घेऊ शकतात याचा अभ्यास केला पाहिजे ..आणि मग ते दार ठोठावले पाहिजे .. त्या लोकांना काही तरी फुकट दे. घरात बायका असतील तर , दोन पावडरचे डबे घेतले तर एक टिकल्यांचे पाकीट फुकट देईन असे काही सागितलेस तर दरवाजा उघडेल आणि तुला ताबडतोब तुझा उजवा पाय आत टाकता येईल ..मग तुला तुझ्याकडे जे आहे ते विकायची संधी तुला मिळेल . वा ! फारच सुंदर प्रकारे त्यांनी हे तुला समजावून सांगितले आहे..

काका ..मला अजून सगळे हे समजले नाही ..पण मला एकदम लक्षात आले कि गणित सोडवताना ...बऱ्याच गणिताने असे आहे ?


स्वरूप हसला . दे. आणि तुझ्या कडे ते विवेकानंदांचे पुस्तक आहे ते सुद्धा दे. अरुणने मोठ्या आनंदाने ती पुस्तके दिली आणि आपल्या कडील बिल बुक काढून त्यावर बिल सुद्धा करून दिले . दारावरची पाटी वाचून त्यावर स्वरुपचे नाव सुद्धा लिहिले.

बैस जरा. मी पैसे घेऊन आलो. असे म्हणून स्वरूप आत बेडरूम मध्ये आला. पाकीटा तून पैसे काढताना त्याचे लक्ष समोरील नोटपॅड कडे गेले. त्याला आपल्या पळपुटेपणाची लाज वाटली. हा इतका लहान मुलगा इतके नकार पचवून सुद्धा आपले प्रयतक सोडत नाही आणि मी इतका उच्च शिक्षित असून मैदान सोडून पळून निघालोय ? एक नवी उर्जा त्याला मिळाल्यासारखे वाटले. मग त्याने शांतपणे आत्महत्येची ती चेकलिस्ट फाडून टाकली. त्याने एक दुसरी लिस्ट करायचे ठरवले . पहिल्या जागी असणार होते. रेगे सरांना भेटणे ..बाहेर येऊन त्याने अरुणला पैसे दिले. अरुण ने पुस्तके नीट टेबलावर ठेवली . त्यावर पावती पण ठेवली आणि तो दरवाज्याकडे वळला. धन्यवाद काका ..अरे हो ..माझे कार्ड तुम्हाला द्यायचे राहूनच गेले. .. मी काही माझे कार्ड छापले नाही . पण माझ्या वहीच्या कागदाचे चार भाग करून त्यावर माझे नाव आणि पत्ता माझ्याच अक्षरात लिहिला आहे . आणि यात जो फोन नंबर आहे तो माझ्या बाबांचा आहे. .हे घ्या. असे म्हणत अरुणने आपल्या वरच्या खिशातून वहीच्या कागदाचे चार पाच तुकडे काढले आणि त्यातील एक कागद त्याने आपल्या दोन्ही हातात धरला . मग तो कमरेत वाकला आणि मोठया अदबीने तो कागदाचा चिटोरा त्याने स्वरूपच्या पुढे धरला. स्वरूप नोकरीत असताना त्यांनी किती जणांना आपले व्हिजिटिंग कार्ड दिले होते ,आणि किती तरी जणांचे स्वीकारले होते. खोटा खोटा आदर दाखवत ..अगदी कमरेपासून झुकून आपले दोन्ही हात पुढे करून ..पण या मुलाचे ..ते वहीच्या एका चौकोनी तुकड्यावर बालिश अक्षरात ..अगदी मराठी अक्षरात लिहिलेले ते व्हिजिटिंगकार्ड घेताना त्याला जेव्हडा आदर वाटला तेव्हडा कधीच वाटला नव्हता. त्याने दोन्ही हात पुढे करून आपल्या हाताच्या ओंजळीत तो चिटोरा घेतला . अगदी खऱ्या खुऱ्या आदराने घेतला. मग तसाच तो आपल्या कपाळाला लावला .

मग अगदी अनावर झालेले आपले अश्रू आवरत स्वरूप ने त्या मुलाचा हात आपल्या हातात घेतला ... अगदी एखाद्या आंतरराष्ट्रीय कंपनीच्या प्रेसिडेंट चा हात हातात घ्यावा तसा ... आणि तो म्हणाला, आपल्याला हे काका सर म्हणाले म्हणून असेल किवा स्वरुपने एव्हडा आदर दाखवला म्हणून असेल पण अरुण एकदम लाजला ..आणि जिन्याकडे वळला. भर भर जिना उतरून नाहीसा झाला .

स्वरूपला म्हणावेसे वाटले अरे ..तू कसला लाजतोस ? मीच लाजले पाहिजे. थोडे वाईट दिवस काय आले ..मी तर पळूनच जात होतो.

त्या मोकळ्या जिन्याकडे पहात स्वरूप किती तरी वेळ गेल्या / मिनिटात घडलेल्या घटनेचा विचार करत निशब्द उभा राहिला. त्याला वाटले , हा अरुण नको त्या वेळीचा पाहुणा म्हणून आला खरा पण , जाताना , माझ्या जीवनात अरुणोदय करून गेला



सुमेध रानडे
मो.९५६१०९३७४०

# राशी भविष्य

**मेष :** हा सप्ताह तुमच्यासाठी परीक्षेचा असणार आहे. तुमचा संयम, तुमचा सात्विक भाव आणि तुमची सचोटी या गोष्टींना धक्का लागण्याचे प्रसंग येऊ शकतात. कामे रखडली जातील. काही प्रमाणात हतबल झाल्यासारखं वाटू शकतं. या आठवड्यात तुम्ही स्वतःला कणखर बनवण्याची गरज आहे. कुठल्याही आमिषाला भुलू नका. लाचारी पत्करू नका. सात्विक मनाला योग्य वाटत नसेल ते काम अजिबात करू नका. कोणतेही नियम मोडू नका. जोखीम उचलू नका. व्यसनात गुंतू नका. अती तिथे माती हे लक्षात ठेवा! आत्मसंयम ठेवा!

**वृषभ :** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक सुख समृद्धी घेऊन येत आहे. तुम्हाला एखादे लहान ध्येय गाठता येईल. एखादी हवी असलेली वस्तू घेता येईल. आर्थिक लाभ होऊ शकतो. अस्थिर परिस्थिती सुधारेल. एकंदरीत हा काळ अगदी पूर्ण नाही पण काही प्रमाणात यश देणार आहे. या आठवड्यात तुम्ही तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. तुमच्या आर्थिक सक्षमतेने इतरांना मदत कशी करता येईल याचा विचार करा. संकुचित वृत्ती सोडा. मन मोठे करा. सगळ्यांना सामावून घ्या. तुमच्या वर्चस्वाचा गैरवापर करू नका. अहंकारासारखा दुसरा शत्रू नाही हे लक्षात ठेवा!

**मिथुन :** हा सप्ताह तुमच्यासाठी जलद गतीचा आहे. तुमच्या कामात तुम्हाला नवीन संकल्पना सुचतील. थोडे मतभेद आणि वादविवाद देखील संभवतात पण एकुणात परिस्थीत चांगली राहील. इतरांसमोर तुमचं बुद्धीचातुर्य उठून दिसेल. तुम्हाला हवी असलेली बातमी मिळेल, किंवा हवी असलेली व्यक्ती भेटेल. एखादा प्रवास घडेल. या आठवड्यात तुम्ही अतिशय प्रामाणिकपणा जपण्याची गरज आहे. रोखठोक वागा, भावनांना बळी पडू नका. संवाद कौशल्यात सुधारणा करा. वाचन, लेखन यासारख्या गोष्टींत मन रमवा. फक्त लहान तोंडी मोठा घास घेऊ नका!

**कर्क :** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाच्या वळणाचा आहे. एक प्रकारे विरक्ती आणणारा हा काळ असू शकतो. कष्टाचे हवे तसे फळ मिळणार नाही. विलंब होईल. पण यामुळेच तुम्ही अंतर्मुख व्हाल आणि नवीन मार्ग सापडेल! परिस्थितीचा स्वीकार करुन आनंदाने मार्गक्रमण कराल. निरस व्हाल पण निराश नाही! स्वार्थ सोडून परमार्थाचा विचार येईल. या आठवड्यात तुम्ही विवेकबुद्धी आणि धीराने वागा. आत्मोन्नतीचा मार्ग शोधा. इतरांकडून फार अपेक्षा ठेवू नका, त्या पूर्ण होणार नाहीत. भौतिक पसाऱ्यातून स्वतःला थोडे अलिप्त करून बघा. एकांतात वेळ घालवा.




**सिंह :** हा सप्ताह तुमच्यासाठी उर्जायुक्त असणार आहे. तुम्ही तुमच्या ध्येयपूर्तीसाठी एक पाऊल पुढे टाकू शकणार आहात. झटपट घडामोडी घडू शकतात. तुमच्या नोकरीत, व्यवसायात किंवा घरातील आवडीच्या कामात एक प्रकारे नवीन चांगली चालना मिळेल. अडथळे येतील पण त्यावर तुम्ही कुशलतेने मात करू शकाल. काही प्रवास घडू शकतात त्यातून तुम्हाला आनंद होईल. या आठवड्यात तुम्ही तुम्हाला जे साध्य करायचं आहे त्यावर एकाग्रपणे काम करा. लक्ष विचलित होऊ देऊ नका. इतरांना देखील घेऊन पुढे चाला. आळस अजिबात नको.

**कन्या :** हा सप्ताह तुमच्यासाठी सोबतीने पुढे वाढण्याचा असणार आहे. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांचे चांगले सहकार्य मिळेल. घरामध्ये जोडीदाराकडून अपेक्षित किंवा त्यापेक्षा जास्त प्रमाणात साहचर्य मिळेल. दुरावलेली नाती पुन्हा जवळ येतील. प्रेम आणि नात्यांच्या बाबतीत आनंददायी घटना घडेल. विवाहास अनुकलता मिळेल. साथ संगतीमुळे अवघड मार्ग सोपा होईल! या आठवड्यात तुम्हाला एकटे राहण्यापेक्षा इतरांच्या सोबत राहणे जास्त फायद्याचे ठरणार आहे. एखाद्या कलेतून आनंद मिळवा. बुध्दीचा तर्क बाजूला ठेवून भावना समजून घ्या.

**तूळ :** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक आणि आर्थिक जडणघडणीचा असणार आहे. इतरांच्या मदतीने निश्चितच एक टप्पा गाठला जाईल. प्रयतकांना यश येईल. तुम्ही केलेल्या कामाला ओळख मिळेल. घर, जमीन, गाडी, नोकरी, व्यवसाय किंवा इतर व्यावहारिक गोष्टींमध्ये चांगली प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही कामामध्ये परिपूर्णता आणायचा प्रयतक करा. इतरांच्या मदतीने, सोबतीने पुढे चाला. दिलेल्या सूचना अंमलात आणा. इतरांना तुम्ही देखील मदत करा. एकट्या पेक्षा मिळून मिसळून काम करा. एकीचे बळ लक्षात ठेवा!

**वृश्चिक :** हा सप्ताह तुमच्यासाठी उर्जादायक आणि प्रेरणादायक आहे. अडकलेल्या गोष्टी मार्गी लागतील. निराशेकडून नव्या उमेदीकडे घेऊन जाणारा हा काळ आहे. कामामध्ये चांगलं यश मिळू शकतं. लोकांना तुमच्या कर्तृत्वाची माहिती होईल. घरामध्ये किंवा कुटुंबामध्ये आनंदाचा प्रसंग येऊ शकतो. काही लपून राहिलेल्या गोष्टी समोर येतील. या आठवड्यात तुम्हाला सचोटी, खरेपणा आणि प्रामाणिकपणा यांच्या आधारे वागण्याची गरज आहे. पारदर्शी पध्दतीने काम करा. एखादं यश मिळालं असेल तर हुरळून जाऊ नका. अभिमान सोडून नम्रता ठेवा.

**धनू :** हा सप्ताह तुमच्यासाठी नवीन उमेद घेऊन येत आहे. मागचं विसरून नवीन सुरुवात करण्यासाठी तयार रहा. एक प्रसन्न आणि उत्साहवर्धक घटना घडू शकते. चांगला सकारात्मक बदल घडू शकतो. तुमचा आत्मविश्वास वाढेल. नवीन संकल्पना सुचतील. नवीन बदल घडतील. या आठवड्यात तुमच्या मनात सुरू असलेले विचार आणि कल्पना लोकांपर्यंत पोचवा. सृजनशीलता बाळगा, वेगळ्या पद्धतीने काम करा. बदल घडत असतील तर ते स्वीकारा. आळस सोडलात तर उन्नती होईलच. केल्यानेच होत आहे आधी केलेची पाहिजे! हे लक्षात ठेवा!

**मकर :** हा सप्ताह तुमच्यासाठी एक पर्याय निवडीचा आणि त्यावर ठाम राहण्याचा असणार आहे. तुम्हाला दिलेलं काम पार पाडण्यात तुमचा कस लागेल. केलेल्या कष्टांना काही प्रमाणात यश मिळेल. इतरांकडून मदतीचा हात मिळेल. कोणत्याही नात्यात दुरावा आला असेल तर त्यात चांगली सुधारणा होऊ शकते. या आठवड्यात तुम्ही एका व्यक्तीला, किंवा एका कामाला, किंवा एकाच गोष्टीला तुमचा पूर्ण वेळ देण्याची गरज आहे. एकाच वेळी अनेक कामे हाताळू नका. दिलेला शब्द पूर्ण करा, त्यासाठी शंभर टक्के प्रयतक करा. एकोप्याने आणि चांगल्या भावनेने वागा.

**कुंभ :** हा सप्ताह तुमच्यासाठी थोडा कठीण असणार आहे. तुम्ही अशा परिस्थितीत अडकाल ज्यात तुम्हाला तुमच्या जागेवर पाय घट्ट रोवून उभं रहावं लागेल. काही लोक, काही स्पर्धक तुम्हाला तुमच्या जागेवरून खाली आणण्याचा प्रयतक करतील. पण तुम्ही मोठ्या आत्मविश्वासाने त्यांना सामोरे जाऊ शकाल. या आठवड्यात तुम्ही येणाऱ्या परिस्थितीला धीराने सामोरे जाण्याची, तुमचं सर्वोत्तम देण्याची गरज आहे. काळजीपूर्वक पुढचे पाऊल टाका. धीट व्हा, घाबरण्याची गरज नाही. स्वतःच स्वतःसाठी उभे रहा, दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका.

**मीन :** हा सप्ताह तुमच्यासाठी वेगवान असणार आहे. तुमचे अडकलेले काम नक्कीच या काळात मार्गी लागणार अशी खूप शक्यता आहे. तुम्हाला कुठेतरी सारखी ये जा करावी लागू शकते. लगीनघाई असल्यासारखे वाटेल. चांगल्या कामासाठी धावपळ होईल. हवी असलेली बातमी येईल किंवा त्यासंबंधी काही माहिती कळेल. या आठवड्यात तुम्ही आळस झटकून कामाला लागण्याची गरज आहे. तुमच्याकडून कोणताही उशीर करु नका. तुमचे संभाषण संवाद यांकडे लक्ष द्या. तुमचा सक्रिय सहभाग ठेवा. काही कामांचा आपणहून पाठपुरावा करा. जितके कष्ट कराल तितके फळ हे निश्चित!

## पान १ वरुन

### नीट पेपर फुटीचा मास्टर माईंड प्रा.कुलकर्णी निघाला

अटक केली पी व्ही कुलकर्णी २०२६ चा पेपर फुटी प्रकरणातील मुख्य आरोपी असल्याची किंवा मास्टरमाईंड असल्याची सीबीआयचे म्हणणे आहे. लातूर येथील दयानंद महाविद्यालयात तब्बल २८ वर्षे प्राध्यापक म्हणून ते कार्यरत होते. निवृत्ती नंतर गेल्या सहा सात वर्षांपासून ते पुण्यात स्थायिक झाले होते. ते विद्यार्थ्यांना विज्ञान शाखे संबंधित मार्गदर्शन करत होते. रसायनशास्त्र या विषयातील तसेच लातूरच्या शिक्षण क्षेत्रातील हुशार अभ्यासू मुलांचे ते आदरस्थान होते. त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. याच विश्वासाचा फायदा घेत पेपर फुटी मध्ये सुद्धा त्यांच्या सहभाग होता. लातूरच्या कैलास नगर येथे त्यांचे घर आहे. कुलकर्णी हे थेट प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या अत्यंत गोपनीय समितीशी संबंधित कामे करत होते. प्राध्यापक असल्याने या प्रक्रियेत त्यांच्या थेट संबंध येत होता.त्यांना मूळ प्रश्नपत्रिके पर्यंत प्रवेश होता.या सर्व परिस्थितीचा फायदा घेत केमिस्ट्रीचा पेपर फोडल्याचा आरोप सीबीआय ने केला आहे.

पुण्यातील जीवशास्त्राच्या प्राध्यापिका मनीषा गुरूनाथ मांढरेला देखील सीबीआयने ताब्यात घेतले आहे.मांढरे ही परीक्षा प्रक्रियेस प्रक्रियेशी संबंधित होती. पेपर फुटी प्रकरणात ती सामील असल्याचे उघड झाल्यानंतर तिलाही अटक करण्यात आली अशी माहिती पुढे आली आहे. वरिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत असणाऱ्या मनीषा मांढरे ही परीक्षा प्रक्रियेशी संबंधित आहे. या प्रकरणात दिल्लीत तिची चौकशी करण्यात आली.यानंतर तिला अटक करण्यात आली आहे.मनीषा मांढरे वनस्पतीशास्त्र त्याचप्रमाणे प्राणीशास्त्र या विषयाच्या प्रश्नपत्रिकाशी संबंधित होत्या. पुण्यातील बिबेवाडी येथील ब्युटी पार्लर चालवणाऱ्या मनीषा वाघमारे तिला देखील या प्रकरणात अटक करण्यात आली आहे.वाघमारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व हमखास पास होण्याची हमी देत घरी बोलवत असे. तेथे प्राध्यापिका मनीषा मांढरे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असत. संभाव्य प्रश्नांना अचूक उत्तरे कोणते द्यावे याची माहिती दिली जाई. ही बाब तपासात उघड झाल्याने मांढरे व ब्युटी पार्लर चालक मनीषा वाघमारे यांना अटक झाली आहे.

सर्वप्रथम बिबेवाडी परिसरातील ब्युटी पार्लर चालवणाऱ्या मनीषा वाघमारे आणि अभियांत्रिकी शाखेत शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याला पुणे पोलिसांनी बुधवारी ताब्यात घेतले होते. यानंतर धनंजय लोखंडे व मनीषा वाघमारे यांना अटक करण्यात आली.या प्रकरणातील गुरुग्राम मधील एक, नाशिक मधील एक,तर राजस्थान मधील जयपूर येथून तीन जणांना अटक झाली. त्यांच्याकडील मोबाईल तसेच इलेक्ट्रॉनिक संच कागदपत्रे ही जप्त करण्यात आली आहे.एकूण नऊ जणांना या प्रकरणात आत्तापर्यंत अटक झाली आहे. पाच आरोपींना सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आलेली आहे.प्राध्यापक पी व्ही कुलकर्णी मनीषा मांढरे यांना विशेष न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. पोलीस कोठडी मिळाल्यानंतर ट्रांजिट रिमांड मिळाल्यानंतर दिल्ली येथील विशेष सीबीआय न्यायालयात हजर केले जाईल अशी माहिती सीबीआयकडून उपलब्ध झाली आहे. ब्युटी पार्लर चालक मनीषा वाघमारेचे पती हे डेंटिस्ट असून बिबेवाडी येथे त्यांच्या दवाखान्याची सीबीआयने जाऊन पाहणी केली. रुग्णालय बंद असल्याचे निदर्शनास आले होते.डॉक्टरांच्या या प्रकरणाशी संबंध आहे का याची देखील चौकशी सुरू आहे.

नाशिक येथून अटक केली आहे शुभम खैरनार त्याच्या साथीदारांच्या साह्याने बायोलॉजी चा पेपर फोडत होता.परीक्षा केमिस्ट्री बायोलॉजी आणि फिजिक्स या तीन विषयांची परीक्षा विद्यार्थ्यांना द्यावी लागत एकूण मार्काच्या या परीक्षेत जास्तीत जास्त मार्क मिळवून देणे देण्याची आश्वासन विद्यार्थी विद्यार्थ्यांना दिले जात होते.कोणालाही संशय येऊ नये म्हणून ७०० मार्कांचा संपूर्ण पेपर एकत्रितपणे न फोडता विषयवार फोडत होते.

लातूर मधील एका प्रख्यात नीट क्लास संचालकाची सुमारे दहा तास चौकशी केल्याचे वृत्त आहे.या चौकशीनंतर सीबीआयचे पथक दिल्लीला निघून गेल्याचे समजते.लातूर येथील प्राध्यापक एस.पी.कुलकर्णी हाच या प्रकरणाच्या मास्टर माईंड असल्याचे उघड झाल्यावर सीबीआयचे पथक लातूरमध्ये दाखल झाले होते. यामुळे राज्यभरात खाजगी नीट क्लासेस चालवणाऱ्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

### इबोला व्हायरसमुळे पासष्ट जणांचा मृत्यू

पदार्थाच्या संपर्कात आल्यास पसरतो जसे की रक्त, रक्तामधून या आजाराचा प्रसार होतो. इबोलावर सध्या तरी कोणताही उपचार तसेच वॅक्सिन उपलब्ध नाही. त्यामुळे व्यक्तीमध्ये जे लक्षणं दिसतात त्यावरूनच डॉक्टर त्याच्यावर उपचार करतात. हा आजार अधिक वेगाने पसरतो त्यामुळे त्याला खूप खतरनाक मानले जाते. त्यामुळे कांगो देशाच्या शेजारी जेवढे देश आहेत, त्या सर्व देशांमध्ये तेथील सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून हाय अलर्ट जारी केला आहे.

सध्या कांगो देशात इबोला आजाराने धुमाकूळ घातला आहे, हा आजार तिथे झपाट्याने पसरत आहे. कांगो देशाच्या इटुरी प्रांतामध्ये हा आजार पसरला आहे. इटुरी हा कांगोचा खूपच दुर्गम भाग असल्यामुळे या आजारावर नियंत्रण मिळवण्यात देखील अनेक अडचणी येत आहेत. कांगोचा इटुरी हा भाग देशाची राजधानी किंशासापासून सुमारे एक हजार किलोमीटर दूर आहे. दरम्यान या आजारामुळे आता शेजारच्या देशांना देखील धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर अनेक देशांमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला असून, जागतिक आरोग्य संघटनेकडून देखील सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### शहराच्या भरीव विकास कामंना प्राधान्य देणार

ललित आरुजा, नगरसेवक रोहित चांदोडे, भिकन वराडे, महादेव परदेशी, प्रफुल्ल पाटील, धीरज जगताप, मयूर ठाकरे, सागर चौधरी, महापालिकेचे शहर अभियंता चंद्रकांत उगले, कनिष्ठ अभियंता प्रणव शिंदे, ठेकेदार मिलिंद मुडावदकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दर्जेदार रस्त्यांसाठी कोट्यवधींचा निधी

आमदार अग्रवाल म्हणाले, की श्री सिद्धेश्वर गणपती मंदिर ते श्री स्वामी समर्थ केंद्र ते महात्मा गांधी पुतळा, तसेच झाशी राणी पुतळा ते अग्रवाल विश्राम भवनापर्यंतच्या व्हाइट टॉपिंग काँक्रिटीकरणाच्या कामासाठी पाच कोटी लाख हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. नागरी दलितेतर वस्ती सुधार योजनेंतर्गत आजपासून हे काम सुरू होत आहे. याच बरोबर श्री सिद्धेश्वर गणपती मंदिर ते संतोषा माता चौकापर्यंतच्या रस्त्याच्या व्हाइट टॉपिंग काँक्रिटीकरणासाठीही भारतरतक डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच शहरातील साक्री रोडवरील संतोषी माता मंदिर चौक ते मोगलाई परिसरातील सुंदरमाधव हॉस्पिटलपर्यंतच्या रस्त्याची काँक्रिटीकरणासाठीही राज्य शासनाने यंदाच्या अर्थसंकल्पात ५ कोटी रुपयांची तरतूद केली असून, तर पारोळा रोडवरील शेतकरी पुतळा ते दाता सरकार मंगल कार्यालयापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे.

वाहतूक कोंडीची समस्या सुटणार

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळ्यापर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी अर्थसंकल्पात २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या मार्गावरील भूमिगत गटारीचे काम पूर्ण झाल्यानंतर महिनाभराने हे कामही सुरू होईल. ही सर्व कामे टप्प्याटप्प्याने सुरू केली जात आहेत. जेणेकरून शहरातील वाहतुकीला अडथळा येणार नाही. या रस्त्यांच्या कामांमुळे शहरातील मुख्य बाजारपेठेसह अन्य भागांतील वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होईल, असा विश्वासही आमदार अग्रवाल यांनी व्यक्त केला.

## पान १ वरुन

### साक्री तालुक्यात तरुण व विवाहीतेची निघृण हत्या

योगेश उर्फ भैय्या बापू खैरनार रा. जैताणे याला ताब्यात घेतले. त्याने पोलिसांना दिलेली माहिती त्याहून खळबळजनक होती. जयश्रीचा एक व्यक्ती खून करत होता. आपण तिला वाचविण्यासाठी गेलो, त्यातच आपल्या हातून त्या तरुणाचा जीव गेल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. शिवाय त्या तरुणाचा मृतदेह उभरांडी (जैताणे) शिवारातील निर्जन वनात त्याच्या गौशाळा वजा मठाजवळील टेकडीवर पुरल्याचेही सांगितले.यानंतर पोलिसांनी आपला मोर्चा उभरांडी शिवारात वळविला. त्या ठिकाणाहून तरुणाचा मृतदेह पोलिसांनी हस्तगत केला.या मृतदेहाची देखील ओळख पटली असून त्याचे नाव अक्षय सोनवणे असून तो भाडणे गावाचा रहिवासी आहे. दरम्यान,योगेश हा बनवेगिरी करत असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले.मात्र, पोलिसांनी आधी पुरलेला मृतदेह ताब्यात घेण्यास प्राधान्य दिले. यासाठी भोंदुला देखील घटनास्थळावर नेण्यात आले होते.

दोघांची हत्या एकाच ठिकाणी

जयश्री काकुस्ते आणि अक्षय सोनवणे यांची हत्या एकाच ठिकाणी झाल्याचे सांगितले जात आहे. संशय येवू नये म्हणून दोघांचे मृतदेह विभिन्न दिशेला टाकण्यात आले.विवाहितेच्या तोंडावर बांधण्यात आलेल्या रुमालावरुन आणि मोबाईलच्या लोकेशनवरुन पोलिसांना मोठी लिड मिळाली.तसेच घटनास्थळावर चारचाकी वाहनाची चिन्हे मिळून आली होती.श्वान पथकाने देखील पोलिसांना महत्वपुर्ण दिशा दाखवली.त्याचमुळे काही तासातच संशयित जेरबंद होवू शकला.मिळालेल्या माहितीनुसार,मठात वाद झाल्याने योगेश खैरनारने आधी अक्षयच्या डोक्यात रॉड टाकून त्याची हत्या केली. त्यानंतर जयश्रीला तिच्याच दुचाकीवर बसवून नेत वाटेत तिचीही हत्या करण्यात आली.मात्र, महिलेच्या मृतदेहाजवळ आढळलेला रुमाल महाराजचा असल्याने पोलिसांचा संशय पक्का झाला होता.

निजामपूर पोलिसांकडून क्विक ॲक्शन

जयश्री काकुस्ते यांच्या हत्येची माहिती मिळताच निजामपूर पोलीस ठाण्याचे प्रभारी मयूर भामरे तात्काळ घटनास्थळावर आपल्या टीमसह पोहचले.सदर घटना वरिष्ठांना कळवत त्यांनी महत्वपुर्ण धागेदोरे जुळवले. फॉरेन्सीक, एलसीबी, डॉग स्क्वॉड आणि निजामपूर पोलिसांनी संयुक्तरित्या मोहिम राबवत मुख्य संशयिताला ताब्यात घेतले.घटनेची माहिती मिळताच एएसपी अजय देवरे देखील घटनास्थळावर पोहचले होते. दरम्यान,या दुहेरी हत्याकांडाची उकल जवळपास झाली असून हे हत्याकांड भोंदुगिरीच्या नादी लागल्यानेच लागल्यानेच घडल्याचे उघड झाले आहे.

योगेश हा भोंदू भगत

विश्वसनिय सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,योगेश हा गुढ्या वथून भविष्य सांगतो अशी चर्चा आहे.शिवाय उभरांडी रस्त्यालगत त्याचा मठ असून त्याला महाराज म्हणून ओळखतात. त्याच्याकडे अनेकजण आपली अडलेली कामे घेवून येतात.जयश्री आणि अक्षय देखील त्याच्याकडे हवन करण्यासाठी गेले होते अशी चर्चा घटनास्थळावर ऐकायला मिळाली.

### धुळे शहरासह तालुक्यातील विकास कामांना गती

खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी सांगितले की, धुळे शहर आणि तालुका हा माझ्या लोकसभा मतदारसंघाचा महत्वाचा भाग आहे. नागरिकांच्या गरजा आणि स्थानिक विकास हा माझा प्राधान्यक्रम आहे. रस्ते, सभामंडप यांसारख्या मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयतक सुरू आहेत. पुढील काळातही विकासकामांचा हा वेग कायम ठेवून अधिकाधिक निधी मंजूर करून आणण्याचा प्रयतक केला जाईल. नागरिकांनीही या विकासकामांबाबत समाधान व्यक्त करत, धुळे शहर व तालुक्यात विकासाच्या दिशेने सुरू झालेली ही घोडदौड पुढेही अखंड सुरू राहावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. धुळे शहर-तालुक्यातील विविध भागात सुरू झालेली ही कामे केवळ रस्ते आणि सभामंडपांपुरती मर्यादित नसून, संपूर्ण परिसराचा विकास अधिक गतिमान करण्यासाठीचा ठोस पाया ठरणार असल्याचे मत स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### जनगणनेच्या कामास नकार दिला

भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता त्यांनी कामास नकार देवून फोन कट केला. भारतीय जनगणना२०२६ चे प्रगणक म्हणून काम करण्यास नकार दिल्याने उपशिक्षिका विरोधात जनगणना अधिनियम १९४८ चे कलम ११(१)(अ)प्रमाणे धुळे शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास शहर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार अतुल सोपान बागुल करीत आहेत.

## पान १ वरुन

### अतिक्रमितांना स्मशानभूमीची जागा

विरशैव लिंगायत गवळी समाज बहुउद्देशीय मंडळ, चितोड ता.जि.धुळे चे अध्यक्ष चिंतामण उदीकर, झामाआप्पा नागापूरे, बंडू दहिहंडे, धोंडीबा उदीकर, प्रकाश जोमिवाळे, गोविंद उदीकर, अर्जुन उदिकर, अशोक दहिहंडे, तानाजी काळागवळी, वाल्मिक नागापूरे, मल्लू यादबोले आदींनी निवेदनाद्वारे दिला आहे.

### नंदनगरीत आजपासून भागवत ज्ञानयज्ञ कथा

करण्यात येणार आहे. शनिवार दि. २३ मे रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत कथा सांगता व भोजन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज दुपारी ३ ते ६ या वेळेत कथा प्रवचन होणार असून कथास्थळ राहते घरी, बांगडी हॉटेल चौक, जळका बाजार, नंदुरबार येथे आहे. या कार्यक्रमासाठी कथा प्रवचक म्हणून वेदमूर्ती अविनाश जोशी महाराज यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयस्वाल परिवार परिश्रम घेत आहे.

### नंदुरबार जिल्ह्यातील खासदार-आमदारांची

चार महिन्यांत तयार करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. पहिल्या नऊ महिन्यांत रोड सेक्टर पॉलिसी तयार करण्यात आली असून नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राज्यातील सुमारे ४७ टक्के रस्त्यांची रुंदी वाढविण्याचे नियोजन असल्याचे असल्याचे कार्यकारी अभियंता श्री. पालवे यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या सल्लागार संस्थेमार्फत तयार करण्यात येणाऱ्या या योजनेत लोकप्रतिनिधींच्या सूचनांनुसार सुमारे ५ टक्के बदल करण्याची तरतूद ठेवण्यात आली आहे. जिल्ह्यातील शहादा-डेडीयापाडा राज्य मार्गाचा राष्ट्रीय महामार्गात समावेश करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्याची माहितीही बैठकीत देण्यात आली. तसेच जिल्हा मार्गांचे राज्य मार्गांमध्ये रूपांतर करण्यासाठी स्वतंत्र सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे कार्यकारी अभियंता श्री. पालवे यांनी सांगितले.

राज्यातील आदिवासी व दुर्गम भागांचा विकास, ग्रामीण संपर्क व्यवस्था मजबूत करणे, उद्योग व पर्यटनाला चालना देणे आणि अपघातमुक्त सुरक्षित रस्ते उभारणे या चार प्रमुख उद्दिष्टांभोवती ही अमृतकालीन रस्ते विकास योजना आकार घेत असल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. तसेच लोकप्रतिनिधींची मागणी आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील वाड्या-पाड्यांना जोडण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत स्वतंत्र आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती जिल्हा परिषद यंत्रणेने दिली. यावेळी झालेल्या चर्चेत खा.गोवाल पाडवी, आ.विजयकुमार गावित, आ.चंद्रकांत रघुवंशी, आ.राजेश पाडवी, आमदार आमश्या पाडवी, आणि आमदार शिरीष नाईक, नियोजन अधिकारी शशांक काळे, नंदुरबार सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश पालवे आदींनी सहभाग घेतला.


**विकणे आहे**

नॅनो 2014
Model 20000 Km
चाललेली एकहाती
कार विकणे आहे.
**9370834513**

**विकणे आहे**

मोक्याची जागा R.C.C
Built up 600 (Sq.Ft)
४ मजली जिना टोपीसह.
धुळे तालुका पोलिस
स्टेशन समोर योग्य किंमत
आल्यास विकणे आहे.
**9423493562**

**पाहिजेत**

शिरपूर येथे
स्वयंपाक कामासाठी १
महिला व घरकामासाठी
१ महिला कायमस्वरुपी
पाहिजे. जेवणाची व
रहाण्याची सोयीसह
आकर्षक पगार मिळेल.
-: संपर्क :-
चेतन पुराणीक
**9209201411**

**Urgently Required**

1) **RMO - 2** (MBBS /BAMS/BHMS/BUMS fresher & experience doctor required)
2) **Nursing Incharge -1** (Minimum 5 years working experience required)
3) **Nursing Staff -5** (ANM/ GNM/ Bsi Nursing fresher & experience staff required)
4) **Receptionist - 3** (Graduate from any stream with computer knowledge fresher & experience required)

**Address -** Om Critical Care Hospital, Agrawal Nagar, Malegaon Road, Dhule.
**Mob. No. 8975579274 / 9518532150**


**१८ वे पुण्यस्मरण**



**कै. सौ. इंदुमती चुनिलाल बारी**
(मृत्यू दि. १७-०५-२००८)
आठवणीच्या गाभाऱ्यात स्थापीली मुर्ती तुमची
तिला वाहतो फुले आम्ही टपकणाऱ्या आसवांची
तुमच्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रध्दांजली सुमनांजली
※ शोकाकुल परिवार ※
चुनिलाल ओंकार बारी (पती)
सौ. सारिका व ईश्वर चुनिलाल आसापुरे (मुलगा)
सौ. भाविका व नितीन चुनिलाल आसापुरे (मुलगा)
सौ. ज्योती व सुनिल रमेश तांबोळी (जावई)
चि. दुर्गेश, पुष्कर, भावेश हेरंब व जान्हवी
**समस्त आसापुरे परिवार.** ३९ ब स्नेहनगर स्टेशनरोड, धुळे.


**पाहिजेत**

**ओमश्री अग्रो टेक प्रा. लि.**
जी-३२ एम. आय. डी. सी. अवधान धुळे
(सोयाबीन सॉल्व्हंट एक्सट्रॅक्शन)

या कंपनीत खाली दिलेल्या पदांची त्वरीत नेमणूक करण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी खालील मेलवर अर्ज करावा.

१) आवक/जावक लिपीक/ गोडावून सुपरवायझर
२) प्रेप ऑपरेटर
३) असिस्टंट प्रेप ऑपरेटर
४) प्रेप हेल्पर
५) वर्कशॉप फिटर
६) वर्कशॉप हेल्पर
७) इलेक्ट्रीशियन (वायरमन)
८) केमिस्ट
९) बॉयलर अटेन्डंट- ग्रेड १
१०)माळी (बागकाम करणारा)

वरील सर्व पदाकरीता किमांन ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तरी इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत आपलाअर्ज E-mail-omshree_sep@rediffmail.com वर पाठविणे.

**चालविण्यास देणे आहे**

धडगाव जि.नंदुरबार
बस स्थानकात हॉटेल
व्यवसायासाठी/
व्यवस्थापक
चालविण्यास देणे आहे.
-: संपर्क :-
**9404576771**

**चालविण्यास देणे आहे**

धुळे शहरातील मध्यवर्ती
बस स्थानकातील
मेन्स पार्लर दुकानासाठी
कारागिर, व्यवस्थापक
चालविण्यास देणे आहे.
-: संपर्क :-
राजु भावसार फेटेवाले
**9404576771**

**पाहिजेत**

कामासाठी पाहिजे
सेल्समन - २
सेल्सगर्ल - २
श्याम वॉच ॲण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
**7219036785**
**9960777594**

**विकणे आहे**

रामचंद्र नगरला लागुन
दोन रस्त्यांच्या कॉर्नरचा
४००० स्केअर फुटाचा
प्लॉट विकणे आहे.
सुरेश चौधरी
**9422286235**

**पाहिजेत**

कॅफे कामासाठी
अनुभवी (शेफ)
कारागिर (१५,००० रू.)
हेल्पर (१०,००० रू.)
पाहिजेत
कॅफे ट्रिट एन जॉय
ग.नं.४ बँक ऑफ
महाराष्ट्र समोर, धुळे.

**पाहिजेत**

सलुन दुकान कामासाठी
चांगला होतकरु
कारागीर पाहिजेत.
-: संपर्क :-
दसेरा मैदान, मालेगाव रोड, धुळे
**9422289047**

**पाहिजेत**

माता हिंगलाज न्युज चॅनलसाठी
वृत्त निवेदक-२, प्रतिनिधी-
रिपोर्टर-२ धुळे/नंदुरबार
व्हिडीओ ईडीटर - २
-: संपादक :-
राजु भावसार फेटेवाले
ग.नं.४, धुळे
**9422286386**
**9404576771**

**पाहिजेत**

होंडा कंपनीचे जनरेटर
रिपेअरिंगसाठी कारागीर पाहिजे.
इलेक्ट्रीशियन - २
वेल्डर - २, पेंटर - २
-: संपर्क :-
राजु भावसार फेटेवाले
ग.नं.४, धुळे
**9422286386**
**9404576771**

**अनारसे**

खास अधिक मासा साठी
उत्तम प्रतीचे अनारसे मिळतील
नोंदणी आवश्यक आहे.
अनारसा पिठ उपलब्ध आहे.
मदर्स किचन
फूलवाला चौक,धुळे
**9049902201**
**7887750864**

**ड्रायव्हर पाहिजेत**

गॅस सिलेंडर वितरण
करण्यासाठी फोर व्हिलर
अनुभवी ड्राईव्हर पाहिजे.
पगार - १०,०००/- १५,०००/-
मंजुश्री गॅस एजंसी
साक्री रोड, धुळे
अमित जावळे
**7517568927**

**पाहिजेत**

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**पाहिजे**

धुळ्यामध्ये माल वाटपासाठी
माणूस/ मुलगा पाहिजे.
लिहता, वाचता आणि हिशोब
करता येणे आवश्यक.
लाईफ लाईन बेकरी
मालेगाव रोड, धुळे
**8999961619**

**पाहिजेत**

हॉस्पिटल कामासाठी प्रशिक्षित
ब्रदर्स आणि सिस्टर पाहिजेत.
दिवस व रात्रपाळीसाठी
अपुर्वा हॉस्पिटल ॲंड क्रिटीकल केअर
जमनागिरी रोड, धुळे
डॉ.अनिल रघुवंशी
**9823085639**
**9423978968**

**प्लॉट विकणे आहे**

मौजे बाळापूर, फागणे
शिवारातील गट नं. (७६)
पैकी ३ आर जमीन
विकणे आहे.
सूर्यवंशी टाईल्स समोर
-: संपर्क :-
**8530140449**
**7219240449**

**पाहिजेत**

माल वाटपासाठी
ड्रायव्हर व
डिलीव्हरी बॉय पाहिजेत
-: समक्ष भेटा :-
कंचन डिस्ट्रीब्युटर्स
तारगल्ली,
सराफ बाजार, धुळे

**कुलिंग इंडिया की पहचान**

Symphony | Crompton

आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या
तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर ०% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते **श्री महावीर** इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०